- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४९ | किंमत : २ रूपये

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# आता 'दिमागी नक्षल पार्टी'ची हवा

## मोदींच्या वक्तव्यानंतर नव्या मोहिमेचे अकाऊंट

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्यदिनाच्या भाषणात दिमागी नक्षल (बौद्धिक नक्षलवाद) या शब्दाचा उल्लेख केल्यानंतर सोशल मीडियावर याचे मोठे पडसाद उमटत आहेत. इन्स्टाग्रामवर रातोरात तयार झालेल्या दिमागी नक्षल पार्टी नावाच्या अकाऊंटने अवघ्या २४ तासांत १.६ लाखांहून अधिक फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला आहे.

इन्स्टाग्रामवरील माहितीनुसार, हे अकाऊंट याच महिन्यात सुरू करण्यात आले असून यापूर्वी त्याचा युझरनेम एकदा बदलण्यात आला आहे. सध्या या अकाऊंटवर ६२ पोस्ट्स असून ते ३५ जणांना फॉलो करत आहे. मात्र, हे अकाऊंट नक्की कोण चालवत आहे, याची कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

**काय म्हणाले होते पंतप्रधान मोदी?**

स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधानांनी माओवादा विरोधातील कारवाईचा उल्लेख करताना म्हटले होते, आम्ही जंगलातील सशस्त्र नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात यश मिळवले असून देशाला या संकटातून मुक्त केले आहे. मात्र, सशस्त्र नक्षलवादी गेले असले, तरी दिमागी नक्षल अजूनही सक्रिय आहेत

**मोदींच्या वक्तव्यानंतर नवीन अकाऊंट**

पंतप्रधानांच्या या विधानानंतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म (पूर्वीचे ट्विटर) वर दिमागी नक्षल जनता पार्टी नावाचे नवीन अकाऊंट तयार झाले. हे अकाऊंट सध्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव, आपचे नेते अरविंद केजरीवाल, युट्यूबर ध्रुव राठी, हास्यकलाकार कुणाल कामरा, अभिनेते प्रकाश राज आणि फॅक्ट-चेकर मोहम्मद झुबेर यांच्यासह १३ प्रमुख अकाऊंट्सना फॉलो करत आहे.

**प्रकाश राज यांची पोस्ट रिट्विट**

दिमागी नक्षल जनता पार्टी या अकाऊंटवरून अभिनेता प्रकाश राज यांची एक पोस्ट रिट्विट करण्यात आली आहे. यात प्रकाश राज यांनी लिहिले होते, दिमागी बना.. मूर्ख बनू नका. प्रश्न विचारा.. गुलामगिरी करू नका. दरम्यान,




पंतप्रधानांच्या विधानावरून राजकीय वाद पेटला असून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी, मला दिमागी नक्षल असल्याचा अभिमान आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे.

**किरेन रिजिजू यांनी दिले होते स्पष्टीकरण**

केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी पंतप्रधानांच्या वक्तव्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सांगितले की, पंतप्रधानांनी विरोधी पक्षनेत्यांना थेट दिमागी नक्षल म्हटलेले नाही. हा शब्द अशा लोकांसाठी वापरला गेला आहे जे माओवाद्यांचे समर्थन करतात, तसेच भारतीय संविधानाचा अनादर करतात, फुटीरतावाद्यांची बाजू घेतात किंवा ईशान्य भारताला उर्वरित भारतापासून वेगळे करणाऱ्या चिकन नेक भागाची नाकेबंदी करण्याचे समर्थन करतात. रिजिजू यांनी शरजील इमाम यांच्या चिकन नेकबाबतच्या जुन्या वक्तव्याचा व्हीडीओ शेअर करत, अशा विचारसरणीला पाठिंबा देणारे लोकच दिमागी नक्षल असल्याचे म्हटले होते.

### थोडक्यात

## आखातात पुन्हा जोरदार धुमश्चक्री

**तेहरान :** इराण आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेला संघर्ष शिगेला पोहोचला आहे. इस्लामाबाद शांती करारानंतरही दोन्ही देशांमध्ये पुन्हा वाजले असून आखातात जोरदार धुमश्चक्री सुरू आहे. अशातच इराणकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकन सैनिकाची हत्या करणाऱ्या किंवा त्याला जिवंत पकडून देणाऱ्या व्यक्तीला ५ अब्ज तोमान (३० हजार डॉलर) बक्षीस दिले जाईल, अशी घोषणा इराणचे लष्करप्रमुख अमीर हातमी यांनी केली आहे. इराणच्या सरकारी माध्यमांनी रविवारी या संदभार्तील वृत्त दिले असून ही कारवाई एखाद्या महिलेने केल्यास तिला दुप्पट रक्कमेचे बक्षीस देण्यात येईल असेही यात नमूद करण्यात आले आहे.

युद्धासाठी आर्थित मदत करण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या नागरिकांच्या मागणीनंतर ही योजना तयार करण्यात आली आहे. जो कुणी अमेरिक सैनिकाची हत्या करेल किंवा त्याला जिवंत पकडून इराणच्या ताब्यात देईल त्याला ३० हजार डॉलर (जवळपास २९ लाख रुपये) बक्षीस देण्यात येईल. एवढेच नाही तर एखाद्या इराणी महिलेने ही कामगिरी फत्ते केल्यास तिला दुप्पट रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येईल अशी घोषणा तेहरानमधील एका कार्यक्रमात बोलताना इराण अमीर हातमी यांनी केली. अमेरिकन सैनिकावर हल्ला करण्यासाठी वापरलेले शस्त्र दुप्पट किमतीत खरेदी केले जाईल आणि त्याच्या बदल्यात संबंधित व्यक्तीला नवीन शस्त्र दिले जाईल. वापरलेले मूळ शस्त्र प्रस्तावित संग्रहालयात जतन करून ठेवले जाणार आहे असेही हातमी यांनी स्पष्ट केले.

# यवतमाळातील टाकळी धरणात बुडून तीन तरुणांचा मृत्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, यवतमाळ**
नागपंचमी आणि श्रावण सोमवारच्या पावन पर्वावर सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असतानाच, यवतमाळात एक अतिशय हृदयद्रावक घटना घडली आहे. शहरानजिकच्या टाकळी येथील धरणाच्या जलाशयात आंघोळीसाठी गेलेल्या तीन तरुणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पियुष यादव, प्रथमेश यादव आणि प्रसाद सातपुते (सर्व रा. यवतमाळ) अशी मृत पावलेल्या युवकांची नावे आहेत. हे तिघेही १६ ते २० वयोगटातील आहेत. या घटनेमुळे संपूर्ण यवतमाळ शहरावर व परिसरात शोककळा पसरली आहे.

आज सोमवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास हे तिघेही मित्र टाकळी येथील तलाव आणि लगतच्या धबधबा परिसरात फिरण्यासाठी व आंघोळीसाठी गेले होते. मात्र, पाण्याचा असलेला प्रवाह आणि जलाशयाच्या खोलीचा योग्य अंदाज न आल्याने तिघेही अचानक पाण्यात ओढले गेले व बुडाले. घटनेची माहिती मिळताच यवतमाळ ग्रामीण पोलीस, जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने धरणाच्या पात्रात युद्धपातळीवर शोधमोहीम राबवण्यात आली. अथक प्रयत्नांनंतर सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास या तिन्ही युवकांचे मृतदेह तलावाबाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. मृतदेह बाहेर निघताच कुटुंबीयांनी केलेला आक्रोश काळजाचा ठोका चुकवणारा होता.

यवतमाळ परिसरात गेल्या काही दिवसांपासून जलपर्यटनाच्या ठिकाणी घडणाऱ्या अपघातांचे प्रमाण चिंताजनक रीतीने वाढले आहे. अवघ्या तीन दिवसांपूर्वी, म्हणजेच १४ ऑगस्ट रोजी यवतमाळनजीकच्याच बोरगाव धरणात दोन महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा बुडून मृत्यू झाला होता. त्या घटनेचे दुःख ताजे असतानाच, आठवड्याभरात ही दुसरी मोठी घटना घडल्याने स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व हळहळ व्यक्त होत आहे. अशा दुर्घटना रोखण्यासाठी प्रशासनाने सर्व प्रमुख धरणे, तलाव आणि धबधब्यांच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवावा आणि तेथे बंदीचे फलक लावावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# जुन्या गाड्यांसाठी ई-१० पेट्रोल पुन्हा सुरू करा!

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
देशात ई-२० पेट्रोलवरून सुरू असलेल्या वादाच्या आणि जुन्या वाहनांच्या मालकांकडून होणाऱ्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर, भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार (सीईए) व्ही. अनंत नागेश्वरन यांनी एक महत्त्वाचा सल्-ला दिला आहे. जुन्या दुचाकी वाहनांसाठी ई १० पेट्रोल पुन्हा उपलब्ध करून देण्यात यावे, असा सल्ला त्यांनी दिला आहे. त्याचबरोबर पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉलचे प्रमाण वाढवण्यापूर्वी अन्नसुरक्षा, पाण्याचा वापर आणि शेतीवर होणारा परिणाम या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे.

एका विशेष लेखात मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन आणि आर्थिक व्यवहार विभागाचे सल्लागार आकाश पूजारी यांनी इंधनातील इथेनॉल प्रमाणावर आपले मत



स्-पष्-ट केले आहे. केवळ जुन्या वाहनांवर ई २० पेट्रोलचा काय परिणाम होतो, एवढाच हा प्रश्न मर्यादित नसून; भविष्यात इथेनॉल निर्मितीसाठी आपल्याला किती जमीन आणि पाणी वापरावे लागेल, तसेच अन्नधान्य पिकांवर त्याचा काय परिणाम होईल, याचा सखोल विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच भविष्यात ई २७ किंवा ई ३० इंधन आणण्याच्या चर्चेवर इशारा देताना त्यांनी स्पष्ट केले की, काही धोरणात्मक निर्णय सहज बदलता येतात, परंतु पिकांच्या पद्धती आणि इंधनासाठी जमीन-पाण्याचे नियोजन एकदा निश्चित झाले की ते बदलणे कठीण जाते.

**तर इंधन हे अन्नाची जागा घेऊ लागेल**

इथेनॉलचे मिश्रण जितके जास्त, तितकी त्यासाठीच्या कच्च्या मालाची मागणी जास्त. भारत सध्या उस, मका, तांदूळ आणि इतर धान्यांपासून इथेनॉलची निर्मिती करतो. इथेनॉलची मागणी वाढल्याने डिस्टिलरीज (दारू/इथेनॉल कारखाने) धान्य आणि उसाचे मोठे खरेदीदार बनत आहेत. मुख्य आर्थिक सल्लागारांच्या मते, यामुळे अर्थव्यवस्थेत एक मूलभूत अडचण निर्माण होते. शिवाय, मका हा पोल्ट्री आणि पशुखाद्याचा महत्त्वाचा घटक असल्याने त्याचा थेट परिणाम अन्नधान्य अर्थव्यवस्थेवर आणि महागाईवर होऊ शकतो.

**उसाचा वापर कमी होणार**

उसाच्या बाबतीत हा परिणाम आधीच दिसू लागला आहे. चालू हंगामात एकूण साखरेच्या उत्पन्नापैकी तब्बल १० टक्के (सुमारे ३० लाख टन) साखर इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आली होती. उसाचा वापर कमी झाल्यास इथेनॉल निर्मितीचा सर्व ताण मका व इतर धान्यांवर पडेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**पाण्याचा गंभीर प्रश्न**

इथेनॉल धोरणाचा संबंध थेट पाण्याशीही जोडलेला आहे. विशेषतः ऊस हे जास्त पाणी लागणारे पीक आहे. एकदा जमिनीचे आणि पाण्याचे नियोजन इंधन निर्मितीसाठी निश्चित झाले आणि त्यावर आधारित उद्योग उभारले गेले, की त्यातून माघार घेणे अत्यंत कठीण आणि त्रासदायक ठरते. ऊर्जा सुरक्षेचे फायदे मिळवताना अर्थव्यवस्थेच्या इतर घटकांना त्याची छुपी किंमत मोजावी लागत नाही ना, याचा शोध घेणे गरजेचे आहे, असे आवाहनही व्ही. अनंत नागेश्वरन यांनी केले आहे.

# उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिर परिसरात चेंगराचेंगरी, १३ जणांची प्रकृती बिघडली

## अनेकजण तुडवले, दात तुटले, बेशुद्ध पडले, करंट पसरल्याची अफवा, १३ जखमी, नागचंद्रेश्वराच्या दर्शनासाठी ४० हजार भाविक रांगेत

**वृत्तसंस्था, उज्जैन**
उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिर परिसरात चेंगराचेंगरीत उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिर परिसरात चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. विजेचा धक्का बसल्याच्या अफवा पसरल्या, ज्यामुळे लोक एकमेकांवर पडले. वाढलेल्या दाबामुळे १३ जणांची प्रकृती बिघडली. पोलिसांच्या माहितीनुसार, भगवान नागचंद्रेश्वराच्या दर्शनासाठी अंदाजे ४० हजार भाविक रांगेत उभे होते. आतापर्यंत अंदाजे साडे पाच लाख भाविकांनी मंदिराला भेट दिली आहे. हे मंदिर महाकाल मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावर असून ते फक्त नागपंचमीला उघडले जाते. जखमी भाविकांना उज्जैन जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. तथापि, जखमींनी गर्दी व्यवस्थापनात निष्काळजीपणा आणि मदत मिळण्यास विलंब झाल्याचा आरोप केला आहे.चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या सागरने सांगितले, "या घटनेपूर्वी मी महाकाल मंदिरात दर्शनासाठी रांगेत उभा होतो. ७-८ तासांनंतर मी हरसिद्धी चौकात पोहोचलो. आम्हाला तिथे दोन तास उभे ठेवण्यात आले." गर्दी वाढत होती आणि आरतीची वेळ असल्याने आम्हाला तिथे थांबवण्यात आले. सागरच्या



म्हणण्यानुसार, बॅरिकेड्स अचानक उघडले, ज्यामुळे चेंगराचेंगरी झाली. तंबू कोसळला आणि इतर सर्व बॅरिकेड्सही कोसळले.

माझे दोन्ही पाय बॅरिकेडखाली अडकले. माझ्या एका पायाला फ्रॅक्चर झाले आहे. मंदिरातील व्यवस्था खूपच खराब होती. मला कोणीही मदत केली नाही. फक्त एक व्यक्ती आली आणि तिने मला वैद्यकीय शिबिरात दाखल करून घेतले.सागरच्या म्हणण्यानुसार, या काळात व्हीआयपी दर्शन सुरू होते. व्हीआयपींना ३०० रुपयांची पावती देऊन दर्शन दिले जात होते. सागर म्हणाला, "मी कालही महाकाल मंदिरात गेलो होतो. कालसुद्धा प्रचंड गर्दीत व्हीआयपींना प्रवेश दिला जात होता. सामान्य लोक मानसरोवर गेटवर चार तास उभे होते. ग्वाल्हेरहून आलेल्या आरती नावाच्या दुसऱ्या एका भक्त महिलेने सांगितले की, या घटनेत तिची मुलगीही जखमी झाली आहे.

ती म्हणाली, "आम्ही दर्शनासाठी ग्वाल्हेरहून आलो होतो आणि आता आम्ही खूप अस्वस्थ झालो आहोत. तिने पाणीसुद्धा प्यायलेले नाही. ती बोलू शकत नाही. तिचे दात तुटले आहेत. तिथे चेंगराचेंगरी झाली. तिला चक्कर आली आणि ती रेलिंगवर पडली. ती बेशुद्ध झाल्यावर आम्ही तिला रुग्णवाहिकेने रुग्णालयात पाठवले."

# १४ राज्यांमधून २५३ जण ताब्यात

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
स्वातंत्र्यदिनाच्या आधी सुरक्षा यंत्रणांनी पाकिस्तानच्या आयएसआय समर्थित शहजाद भट्टी नेटवर्कविरोधात मोठी कारवाई केली. या कारवाईत १४ राज्यांमधून २५३ जणांना ताब्यात घेण्यात आले. या नेटवर्कविरोधात आतापर्यंत ८० हून अधिक एफआयआर दाखल करण्यात आले असून २०० हून अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, मोदी सरकारने स्वातंत्र्यदिनाच्या आसपास देशात दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया करण्याचा कट उधळून लावला. मोदी सरकारने आयएसआय-समर्थित दहशतवादी गट शहजाद भट्टी नेटवर्क स्वातंत्र्यदिनाच्या आधी उद्ध्वस्त केला आणि २०० हून अधिक दहशतवाद्यांना अटक करून त्यांचे घातपात व हल्ल्यांचे मनसुबे उधळून लावले. भारतीय सुरक्षा दलांनी १४ राज्यांमधील विविध ठिकाणी समन्वय साधून कारवाया केल्या आणि हे नेटवर्क उद्ध्वस्त केले. दहशतवादाप्रती भारताच्या शून्य-सहिष्णुतेचे हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे. या गटाकडून आयएसआयच्या फंडमधून घेतलेले आयईडी स्फोटके, पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीची खूण असलेले ग्रेनेड यांसारखा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

संपादकीय लेखणीतून...

## मानवतावाद

आज मानवतावादी दिन, ज्याला आपण विश्व मानवतावादी दिन म्हणूनही ओळखतो, हा दिन दरवर्षी १९ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिन जगभरातील मानवतावादी सेवकांना, त्यांच्या सेवाभावी कार्यांना आणि त्यांनी मानवतेसाठी दिलेल्या अमूल्य योगदानाला सलाम करण्यासाठी समर्पित आहे. मानवतावाद ही माणसाला केंद्र मानून विचार करणारी एक महत्त्वाची विचारसरणी आहे. यात मानवी हितसंबंध, सुख-दुःख, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवी मूल्ये यांना सर्वोपरि मानले जाते. हा दृष्टिकोन मानवाला त्याच्या स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार मानतो. मानवतावादी दिनाची सुरुवात सन २००३ मध्ये बगदाद येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयावरील हल्ल्याच्या स्मरणार्थ करण्यात आली होती. या हल्ल्यात २२ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यामध्ये मानवी हक्कांसाठी लढणारे अनेक कार्यकर्ते होते. त्यानंतर, सन २००९ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी दि. १९ ऑगस्टला अधिकृत मानवतावादी दिन म्हणून घोषित केले. मानवतावादी दिनाच्या निमित्ताने, जागतिक पातळीवर मानवतेच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित करणाऱ्या व्यक्ती आणि संघटनांना ओळख दिली जाते. या दिवशी विविध कार्यक्रम, चर्चासत्रं, वर्कशॉप्स आणि समाजोपयोगी उपक्रम आयोजित केले जातात, ज्यात लोकांना मानवतावादी सेवांबद्दल अधिक माहिती मिळते आणि त्यांना या सेवेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केलं जातं.

सन २०१५ मध्ये प्रख्यात मानवतावादी अँड्र्यू कॉपसन यांनी मानवतावादाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली: १) मानवतावाद विश्वाच्या आकलनाच्या बाबतीत निसर्गवादी आहे; विज्ञान आणि मुक्त जिज्ञासा आपल्याला विश्वाबद्दल अधिक समजून घेण्यास मदत करतील. हा वैज्ञानिक दृष्टिकोन माणसाला माणूस म्हणून कमी लेखत नाही. २) मानवतावादी स्व-परिभाषित, अर्थपूर्ण आणि आनंदी जीवनाच्या शोधाला महत्त्व देतात. ३) मानवतावाद नैतिक आहे; नैतिकता हा माणसांना त्यांचे जीवन सुधारण्याचा एक मार्ग आहे. ४) मानवतावादी वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी व्यावहारिक कृती करतात.

या दिवशीचा मुख्य उद्देश म्हणजे, मानवी मूलभूत गरजा, तातडीची मदत, आपत्ती व्यवस्थापन आणि दीर्घकालीन पुनरुत्थानाच्या कार्यांना समर्थन देणं. यामध्ये मानवतावादी सेवकांनी दिलेल्या योगदानाचं महत्त्व अधोरेखित केलं जातं, ज्यांनी अनेक संकटांमध्ये स्वतःचं आयुष्य धोक्यात घालून इतरांना मदत केली आहे. मानवतावादी दिनाच्या निमित्ताने, आपण सगळ्यांनी आपल्या समाजातील गरजू लोकांसाठी थोडं योगदान द्यायला हवं. मग ते रक्तदान असो, आर्थिक मदत असो किंवा गरजूंना अन्न, वस्त्र पुरवणं असो, छोट्याशा कृतीमुळे मोठा बदल घडवता येतो. मानवतावाद ही एक तात्विक भूमिका आहे जी मानवाच्या कर्तृत्वावर आणि वैयक्तिक व सामाजिक क्षमतेवर भर देते आणि त्यांनाच गंभीर नैतिक व तात्विक चौकशीचा आरंभबिंदू मानते. "मानवतावाद" या संज्ञेचा अर्थ, तिच्याशी संबंधित असलेल्या एकामागून एक बौद्धिक चळवळींनुसार बदलत गेला आहे. इटालियन प्रबोधनकाळात, ग्रीक अभिजात ज्ञानाने प्रेरित झालेल्या इटालियन विद्वानांनी प्रबोधनकालीन मानवतावाद चळवळीला जन्म दिला. ज्ञानोदय युगात, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मानवतावादी मूल्यांना बळकटी मिळाली, ज्यामुळे मानवाला जगाचे अन्वेषण करण्याचा आत्मविश्वास मिळाला. २० व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत, युरोप आणि अमेरिकेत मानवतावादाला समर्पित संघटना भरभराटीस आल्या आणि तेव्हापासून त्यांचा जगभर विस्तार झाला आहे. २१ व्या शतकाच्या सुरुवातीला ही संज्ञा सामान्यतः मानवी कल्याणावर लक्ष केंद्रित करणे दर्शवते आणि मानवी स्वातंत्र्य, आनंद, स्वायत्तता व प्रगतीचे समर्थन करते. ही संकल्पना व्यक्तींच्या उन्नती आणि विकासासाठी मानवतेला जबाबदार मानते, सर्व मानवांच्या समान आणि अंगभूत प्रतिष्ठेचे समर्थन करते आणि जगाच्या संदर्भात मानवाच्या कल्याणावर भर देते. मानवतावादी सहसा मानवाधिकार, भाषण स्वातंत्र्य, पुरोगामी धोरणे आणि लोकशाहीचे समर्थन करतात. २० व्या शतकापासून संघटित मानवतावादी चळवळी बहुतांशी धर्मनिरपेक्षतेशी संलग्न आणि अधार्मिक आहेत , ज्याला 'ह्युमॅनिस्ट सोसायटी' सारखे काही अपवाद आहेत, जी मानवतावादी धर्मगुरूंना (चॅपलेन) मान्यता देते. समकालीन वापरात, एक तत्त्वज्ञान म्हणून मानवतावाद म्हणजे मानवी कर्तृत्वावर केंद्रित असलेला एक ईश्वर-निरपेक्ष दृष्टिकोन, आणि जगाला समजून घेण्यासाठी दैवी स्त्रोताकडून मिळणाऱ्या प्रकटीकरणाऐवजी केवळ विज्ञान आणि तर्कावर अवलंबून राहणे. अनेक मानवतावादी धमार्ला नैतिकतेची पूर्वअट मानत नाहीत आणि म्हणूनच मानवतावादी शिक्षण आणि शासनाच्या हस्तक्षेपात होणाऱ्या अतिरिक्त धार्मिक हस्तक्षेपाला विरोध करतात.

ज्यांच्या नावात "मानवतावाद" हा शब्द वापरला जातो अशा इतर संज्ञांमध्ये खालील संज्ञांचा समावेश आहे- १) नैतिक किंवा धार्मिक मानवतावादः नैतिक संस्कृतीचे समानार्थी शब्द . हे २० व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेत प्रमुख होते आणि मानवांमधील संबंधांवर लक्ष केंद्रित करत होते. अंडरस्टँडिंग ह्युमॅनिझम हे धार्मिक मानवतावादाचे वर्णन "मानवतावादाचे एक वेगळे, धार्मिक स्वरूप नाही, तर मानवतावाद म्हणजे काय याचे वर्गीकरण करण्याचा एक वेगळा मार्ग आहे" असे करते.

# राष्ट्रभक्ती, लोकशाही आणि राजकीय भान

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

आपल्या देशात राजकारण करायला वर्षातील ३६४ दिवस पुरतात. संसदेच्या सभागृहापासून ते गल्लीबोळातील जाहीर सभांपर्यंत आरोप-प्रत्यारोपांची राळ उडवून देण्यासाठी राजकीय पक्षांना पूर्ण वर्ष मोकळे असते. पण वर्षातून येणारे स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनासारखे दोन-तीन राष्ट्रीय सण तरी या पक्षीय चिखलफेकीपासून पूर्णपणे मुक्त असायला हवेत. दुर्दैवाने, गेल्या काही काळापासून आपल्या देशातील राजकीय परिपक्वता इतकी खालावली आहे की, राष्ट्रगीत, राष्ट्रगान आणि राष्ट्रीय सोहळ्यांनाही वादाच्या भोवऱ्यात ओढले जात आहे. नुकत्याच स्वातंत्र्यदिनी काँग्रेस मुख्यालयात 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण गायनादरम्यान घडलेला प्रकार असो, किंवा लाल किल्ल्यावरील शासकीय सोहळ्याला प्रमुख विरोधकांनी लावलेली दांडी असो..या दोन्ही घटनांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, आपण राष्ट्रीय प्रतीकांचे गांभीर्य आणि लोकशाहीतील स्वतःच्या जबाबदाऱ्या पार विसरत चाललो आहोत.

पहिला मुद्दा आहे 'वंदे मातरम्'च्या गायनावरून रंगलेल्या वादाचा. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिलेले मूळ गीत जर संगीतासह पूर्ण सहा कडव्यांत गायचे ठरवले, तर त्याला सलग साडेतीन ते चार मिनिटे लागतात. स्वातंत्र्यलढ्यापासून चालत आलेल्या परंपरेनुसार आणि २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीने घेतलेल्या निर्णयानुसार आपण या गीताची पहिली दोनच कडवी साधारण ६५ सेकंद अधिकृत राष्ट्रगान म्हणून गातो. यामागे धार्मिक समतोलासोबतच एक अत्यंत महत्त्वाचा आणि व्यावहारिक विचार होता. कोणताही तरुण किंवा सैनिक तीन-चार मिनिटे ताठ 'सावधान' स्थितीत उभा राहू शकतो; पण लहान मुले, वयाच्या सत्तरी-ऐंशीत पोहोचलेले ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि आजारी व्यक्तींना कोणत्याही आधाराविना सलग इतका वेळ स्तब्ध उभे राहणे शारीरिकदृष्ट्या अशक्य असते. रक्ताभिसरण मंदावणे, चक्कर येणे, रक्तदाब अचानक कोसळणे आणि तोल जाऊन पडणे हे आजारपणातील किंवा वार्धक्यातील अगदी नैसर्गिक शारीरिक धोके आहेत. जर ८०-८३ वर्षांचे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासारखे ज्येष्ठ नेते मंचावर अस्वस्थ झाले आणि त्यांच्यासाठी सहकाऱ्यांनी खुर्चीची मागणी केली, तर त्याला लगेच 'देशद्रोह' किंवा 'राष्ट्रगानाचा जाणूनबुजून केलेला अवमान' ठरवून राजकीय हायतौबा माजवणे हा निव्वळ असंवेदनशील आणि बालिशपणाचा कळस आहे.

सर्वोच्च न्यायालयानेही अनेकदा स्पष्ट केले आहे की, शारीरिक मर्यादांमुळे कोणी उभे राहू शकले नाही तर ती व्यक्ती देशद्रोही ठरत नाही. राष्ट्रभक्ती ही केवळ ताठ उभे राहण्यात नसून ती मनात आणि आचरणात असावी लागते. पण हे नाण्याचे एकच अंग झाले. या नाण्याला दुसरी बाजूही आहे आणि ती म्हणजे सार्वजनिक मंचावर वावरणाऱ्या सर्वोच्च नेतृत्वाचे राजकीय भान आणि शिस्त. जेव्हा तुम्ही देशातील एका प्रमुख राष्ट्रीय पक्षाच्या मुख्यालयात, कॅमेऱ्यांच्या आणि संपूर्ण देशाच्या नजरेसमोर उभे असता, तेव्हा तुमच्या प्रत्येक हालचालीचा एक राजकीय व सामाजिक अर्थ काढला जातो. जर आपल्या ज्येष्ठ नेत्याला प्रकृती अस्वास्थ्यामुळे किंवा वयोमानामुळे सलग उभे राहणे शक्य नव्हते, तर ही साधी गोष्ट कार्यक्रमाच्या संयोजकांना आणि वरिष्ठ नेत्यांना आधी का सुचले नाही.? राष्ट्रगान सुरू होण्यापूर्वीच त्यांच्यासाठी मंचावर योग्य आसनव्यवस्था केली गेली हवी होती. राष्ट्रगान सुरू असताना एकमेकांशी कुजबुजणे, हाताने इकडेतिकडे इशारे करणे किंवा गाणे थांबवल्यासारखे हावभाव करणे हे निश्चितच जाहीर शिस्तीला धरून नाही. अशा निष्काळजीपणामुळे जनतेमध्ये एक अत्यंत चुकीचा संदेश जातो आणि राजकीय विरोधकांच्या हातात विनाकारण आयते कोलीत मिळते. मनात देशभक्ती असून भागत नाही, तर अशा सर्वोच्च क्षणी आपल्या देहबोलीतून आणि शिस्तीतूनही त्या प्रतीकांप्रती असलेला आदर स्पष्टपणे दिसावा लागतो. या बाबतीत काँग्रेस नेतृत्वाकडून नियोजनशून्य आणि हलगर्जी वर्तन झाले, हे नाकारता येत नाही.

दुसरा तितकाच गंभीर आणि कळीचा मुद्दा म्हणजे लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य शासकीय सोहळ्यातील विरोधकांची अनुपस्थिती. गेल्या काही वर्षांपासून हा एक अतिशय चुकीचा पायंडा पडू पाहत आहे. लाल किल्ला हा काही कोण्या एका राजकीय पक्षाचा किंवा सध्याच्या सत्ताधाऱ्यांचा खाजगी मंच नाही; तो संपूर्ण १४० कोटी देशवासीयांच्या सार्वभौमत्वाचा, संविधानाचा आणि सीमेवर बलिदान देणाऱ्या जवानांच्या शौर्याचा राष्ट्रीय मंच आहे. स्वातंत्र्यदिनी तिथे होणारे ध्वजारोहण हे पंतप्रधान कोणत्याही पक्षाचे असोत, देशाच्या सर्वोच्च कार्यकारी प्रमुखाचे प्रतिनिधित्व असते. अशा ऐतिहासिक सोहळ्याला देशातील प्रमुख विरोधी पक्षनेत्यांनी अनुपस्थित राहणे हे कोणत्याही सुजाण नागरिकाला पटणारे नाही. सत्ताधाऱ्यांनी आम्हाला पहिल्या रांगेत बसवले नाही, योग्य प्रोटोकॉल दिला नाही किंवा भाषणातून आमच्यावर राजकीय हल्ले होतात, यांसारखी तकलादू कारणे सांगून राष्ट्रीय उत्सवावर बहिष्कार टाकणे हे जबाबदार विरोधकांना अजिबात शोभत नाही. जगासमोर भारताच्या लोकशाहीची प्रगल्भता आणि अंतर्गत ऐक्य दाखवण्याची हीच ती सर्वोत्तम वेळ असते. तिथे उपस्थित राहून देशाप्रती आपली निष्ठा दाखवणे, हा विरोधकांचा संविधानात्मक आणि नैतिक धर्म आहे.

जागतिक पातळीवर भारताकडे आज केवळ एक मोठी बाजारपेठ म्हणून नव्हे, तर एक प्रगल्भ लोकशाही आणि उगवती महासत्ता म्हणून पाहिले जाते. अशा वेळी भारताचे अंतर्गत ऐक्य आणि सलोखा हा जगासाठी एक आदर्श असला पाहिजे. जेव्हा आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे नाव येते, तेव्हा आपल्यातले पक्षीय मतभेद गळून पडले पाहिजेत आणि चौदाशे कोटी जनतेचा एकसंध, कणखर आवाज जगासमोर गेला पाहिजे. आपले अंतर्गत राजकारण कितीही टोकाचे असले, तरी ते देशाच्या सार्वभौमत्वाला, राष्ट्रीय सुरक्षेला आणि संविधानाच्या चौकटीला धरूनच असायला हवे.

लोकशाहीत विरोधकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, पण त्यांच्या राजकारणाचा एकमेव केंद्रबिंदू 'देशाचा विकास' हाच असायला हवा. रोजगार, शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था, शेती आणि पायाभूत सुविधांचा वेग कसा वाढवायचा, या मुद्द्यांवर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना संसदेत आणि रस्त्यावर जाब विचारला पाहिजे. विकासाच्या धोरणांवरून सत्ताधाऱ्यांशी स्पर्धा करणे हा विधायक मार्ग आहे. परंतु विकासाचे मूळ मुद्दे सोडून केवळ विरोधासाठी विरोध करणे किंवा सत्तेच्या हव्यासापोटी देशाच्या मूळ पायावरच घाव घालणे हे जबाबदार विरोधी पक्षाला शोभत नाही.

नेत्यांमधला व्यक्तिगत राग, रोष किंवा हेवेदावे हे त्यांच्यापुरते मर्यादित असायला हवेत. निवडणुकीच्या मैदानात राजकीय भाषणे करताना हा राग व्यक्त होऊ शकतो, पण तो राग आणि द्वेष देशाच्या अस्मितेशी किंवा आंतरराष्ट्रीय प्रतिमेशी जोडता कामा नये. आपल्या अंतर्गत भांडणांचा आणि क्षुल्लक वादांचा वापर जर जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा मलीन करण्यासाठी होत असेल, तर ते थेट राष्ट्रहिताशी प्रतारणा ठरते.

निवडणुका, सरकारे आणि राजकीय पक्ष येत-जात राहतील; पण देश चिरंतन आहे. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन यांसारखे राष्ट्रीय सोहळे, आंतरराष्ट्रीय घडामोडी किंवा देशाच्या सीमेवरील सुरक्षेचा प्रश्न यावर सर्व राजकीय पक्षांनी आपले झेंडे बाजूला ठेवून एकत्र उभे राहिले पाहिजे. जेव्हा आपण देशांतर्गत राजकारणात व्यक्तिगत अहंकार बाजूला ठेवून विकासाला आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान देऊ, तेव्हाच जगासमोर भारताच्या परिपक्व लोकशाहीचे आणि अभेद्य ऐक्याचे खरे दर्शन घडेल. देशातील लोकशाही अबाधित राखण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष ही त्या लोकशाहीच्या रथाची दोन चाके मानली जातात. एका चाकाने जरी स्वतःचा तोल गमावला, तर संपूर्ण व्यवस्थेचा डोलारा कोसळतो. संसदेत सरकारची धोरणे चुकतात तिथे विरोधकांनी आक्रमकपणे जाब विचारलाच पाहिजे, त्यांच्या चुकीच्या निर्णयांवर रस्त्यावर उतरून सडकून टीका केलीच पाहिजे; तो विरोधकांचा घटनात्मक हक्क आहे. मात्र, हा विरोध करत असताना राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रगान आणि देशाची अखंडता यांच्यासमोर झुकताना अहंकार, पक्षीय खुन्नस आणि निष्काळजीपणा पूर्णपणे बाजूला ठेवला गेला पाहिजे. राष्ट्रभक्ती ही रोज मंचावर छाती ठोकून ओरडून दाखवायची गोष्ट नसते, हे जितके खरे आहे, तितकेच राष्ट्रीय सोहळ्यांच्या वेळी किमान शिष्टाचार, गांभीर्य आणि परिपक्वता दाखवणे हे देशाच्या राजकारणात वावरणाऱ्या प्रत्येकाचे आद्यकर्तव्य आहे.

राष्ट्रीय सोहळे हे देशाचा अभिमान आणि एकात्मतेचे प्रतीक असतात. त्यांचे पावित्र्य राखणे आणि राजकीय परिपक्वता दाखवणे हे देशाच्या लोकशाही बळकटीसाठी अत्यंत गरजेचे आहे. पक्षीय राजकारणापेक्षा राष्ट्रीय हित आणि संविधानाचा सन्मान सर्वोपरि मानणे म्हणजेच खरी राजकीय परिपक्वता होय.

– ९५६१५९४३०६

# कांगारूंच्या बालेकिल्ल्यात बांगलादेशचा ऐतिहासिक पराक्रम, गालेत पावसाचा अडथळा

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

जागतिक कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एकाच वेळी दोन वेगवेगळ्या उपखंडांत रणनीती, कौशल्य आणि निसर्गाच्या लहरीपणाचा थरारक संगम पाहायला मिळत आहे. डार्विनच्या वेगवान खेळपट्टीवर बांगलादेशने ऑस्ट्रेलियाचा बालेकिल्ला उद्ध्वस्त करत अविस्मरणीय इतिहास रचला, तर गालेच्या ऐतिहासिक मैदानावर भारत आणि श्रीलंका यांच्यातील द्वंद्व मान्सूनच्या मुसळधार पावसाशी आणि वेळेच्या समीकरणाशी चाललेली मोठी लढत ठरत आहे.

ऑस्ट्रेलियातील डार्विनच्या टीआयओ स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत बांगलादेशने बलाढ्य ऑस्ट्रेलियाला ९ गडी राखून धूळ चारली. विदेशी खेळपट्ट्यांवर बांगलादेशचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय मानला जात आहे.

पहिला डाव (ऑस्ट्रेलिया - १९८): नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या आघाडीच्या फळीला बांगलादेशी वेगवान गोलंदाज हसन महमूदच्या (६/५५) अचूक टप्प्याने पूर्णपणे उद्ध्वस्त केले. ऑस्ट्रेलियन संघ पहिल्याच दिवशी अवघ्या १९८ धावांत गारद झाला.

बांगलादेशची भक्कम आघाडी (४२६ धावा): प्रत्युत्तरात तांझिद हसनच्या आक्रमक शतकाने (१०१) आणि कर्णधार नजमुल हुसेन शांतोच्या अर्धशतकी खेळीने सामन्यावर पकड मजबूत केली. बांगलादेशने पहिल्या डावात २२८ धावांची भक्कम आघाडी घेतली.

दुसरा डाव (ऑस्ट्रेलिया - २८४): ऑस्ट्रेलियाकडून दुसऱ्या डावात कॅमेरॉन ग्रीनने (१०४) झुंजार शतकी खेळी करून डावाचा पराभव टाळला, परंतु मेहेदी हसन मिराझच्या (५/६६) फिरकीसमोर उर्वरित फलंदाज निष्प्रभ ठरले.

ऐतिहासिक क्षणः विजयासाठी मिळालेले अवघे ५७ धावांचे लक्ष्य बांगलादेशने एका गड्याच्या मोबदल्यात गाठून जागतिक कसोटी अजिंक्यपद गुणतालिकेत चौथ्या स्थानी झेप घेतली.

**कमिन्सने ग्रेग चॅपेलच्या विक्रमाची बरोबरी केली**

पॅट कमिन्सच्या कर्णधारपदाखाली, ऑस्ट्रेलियाला २०२४ मध्ये मायदेशात भारताकडून पहिल्या कसोटीत पराभवाला सामोरे जावे लागले होते. आता, बांगलादेशने डार्विनमध्ये कांगारूंना ९ गडी राखून पराभूत करून, कमिन्सच्या कर्णधारपदाखाली मायदेशात दुसरा पराभव पत्करला आहे. यामुळे, ग्रेग चॅपेलनंतर दोन वेगवेगळ्या आशियाई संघांविरुद्ध नेतृत्व करून ऑस्ट्रेलियाचा मायदेशात पराभव होताना बघणारा तो दुसरा ऑस्ट्रेलियन कर्णधार ठरला आहे.

ग्रेग चॅपेलच्या कर्णधारपदाखाली, ऑस्ट्रेलियाला मायदेशात पाकिस्तान आणि भारताकडून पराभव पत्करावा लागला होता. १९७७ मध्ये, पाकिस्तानने सिडनीमध्ये ऑस्ट्रेलियाला ८ गडी राखून पराभूत केले होते, तर त्याच काळात भारताने मेलबर्नमध्ये ५९ धावांनी विजय मिळवला होता. याशिवाय, १९८१ मध्ये, पाकिस्तानने मेलबर्नमध्ये ऑस्ट्रेलियाला एक डाव आणि ८२ धावांनी पराभूत केले होते.

डार्विनमधील या ऐतिहासिक विजयामुळे बांगलादेशला २०२५-२७ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतही लक्षणीय आघाडी मिळाली आहे. या विजयानंतर, बांगलादेशची गुणांची टक्केवारी ५८.३३ वरून ६६.६७ पर्यंत वाढली असून, ते चौथ्या स्थानावर कायम आहेत. दरम्यान, ऑस्ट्रेलिया डब्ल्यूटीसी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर कायम आहे, पण त्यांची स्थिती कमकुवत झाली आहे. पराभवानंतर त्यांची गुणांची टक्केवारी ८७.५० वरून ७७.७७ पर्यंत घसरली आहे. सध्याच्या डब्ल्यूटीसी चक्रातील नऊ कसोटी सामन्यांपैकी ऑस्ट्रेलियाने दोन सामने गमावले आहेत.

**गाले कसोटी (दिवस २): पावसात अडकलेला सामना आणि आक्रमक रणनीती**

श्रीलंकेच्या गाले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी पावसाने मोठे विघ्न निर्माण केले. ओल्या मैदानामुळे आणि वारंवार येणाऱ्या पावसाच्या सरींमुळे दुसऱ्या दिवशी केवळ ३६ षटकांचा खेळ होऊ शकला.

पडिक्कलची संयमी फलंदाजी: पहिल्या दिवसाच्या शतकानंतर दुसऱ्या दिवशी देवदत्त पडिक्कलने कठीण परिस्थितीत १६७ धावांची मॅरेथॉन खेळी साकारत भारतीय धावसंख्येला आकार दिला.

हवामानाचा लहरीपणाः खेळपट्टी बराच वेळ ताडपत्रीखाली राहिल्याने खेळपट्टीतील ओलाव्याचा श्रीलंकन फिरकीपटू प्रबाथ जयसूर्याने अचूक फायदा घेत भारताच्या मधल्या फळीला धक्के दिले.

निर्णयाची घाई आणि रणनीतीः पावसाने वाया गेलेल्या ५४ षटकांमुळे सामन्यात निकाल मिळवण्यासाठी भारतीय संघाने आक्रमक पवित्रा घेत जलद धावा जमवण्याचा प्रयत्न केला, तर श्रीलंकेने खेळ लांबवत भारताला कमीत कमी वेळेत रोखण्याची रणनीती आखली.

डार्विनमधील बांगलादेशचा विजय हा नवोदित संघांच्या दुर्दम्य आत्मविश्वासाचे प्रतीक ठरला, तर गालेची खेळपट्टी ही निसर्गाच्या लहरीपणापुढे क्रिकेटच्या रणनितीची आणि संयमाची कसोटी घेत आहे.

– ९०९६३७२०८२

# निसर्गाच्या संरक्षणासाठी नागपंचमीच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून येते. श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते. नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो. नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे. याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे. या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी.

पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात.अशीही आख्यायिका आहे की,एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर, वखर, कोणतेही खोदकाम करीत नाही किंवा कोणत्याही अवजारांचा वापर होत नाही. त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.

भाज्या चिरायच्या नाही,तव्याचा वापर नाही, कांडन नाही,कापन नाही,असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुतीर्ची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.देशात श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज(सजावट)केल्या जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने पाळला जातो.श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची,शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.

श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे. पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा. तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील "नाग मंडळे"नाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुर्तीची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळमध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढतात. आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे.त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.

आजही भारतातील महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे. नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात भव्यदिव्य यात्रा असते. त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या.त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे. त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो. भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी,वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते. त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणें अत्यंत गरजेचे आहे.

– ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# एमपीएससी निकालात 'महाज्योती'ची सुवर्णभरारी

## १२३ बहुजन विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश, राज्य कर निरीक्षक पदाच्या ३५ टक्के जागांवर महाज्योतीची मोहोर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बहुजन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा मोठे यश मिळाले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अराजपत्रित गट-ब दुय्यम सेवा २०२५ अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्य कर निरीक्षक (स्टेट टॅक्स इन्सपेक्टर) आणि दुय्यम निबंधक (सब रजिस्ट्रार) मुख्य परीक्षेच्या निकालात महाज्योतीच्या तब्बल १२३ बहुजन विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. राज्य कर निरीक्षक पदाच्या एकूण २८० जागांपैकी १०१ विद्यार्थी महाज्योतीचे असून, एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये त्यांचा वाटा तब्बल ३५ टक्के आहे. तर दुय्यम निबंधक पदाच्या ८४ जागांपैकी २२ विद्यार्थी महाज्योतीचे असून, या पदातील त्यांचा वाटा २५ टक्के आहे. दोन्ही पदांमध्ये मिळून १२३ विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश संस्थेच्या प्रशिक्षणाची आणि मार्गदर्शनाची प्रभावीता अधोरेखित करणारे ठरत असल्याचे मत महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केले. पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यातही महाज्योतीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने यशस्वी होतील, असा विश्वास महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी व्यक्त केला. राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेली महाज्योती ही स्वायत्त संस्था गेल्या सात वर्षांपासून बहुजन विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण, सक्षम मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आहे.

या प्रयत्नांमुळे स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या यशाची व्याप्ती वाढत असून, प्रशासनातील विविध सेवांमध्ये त्यांचा सहभागही वाढत आहे. याशिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२४ मधील अराजपत्रित परीक्षेच्या जानेवारीत महिन्यात जाहीर झालेल्या अंतिम निकालातही महाज्योतीच्या १५० विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून मिळणारे हे यश उद्दिष्टपूर्तीची दिशा स्पष्ट करणारे असल्याचेही मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले.



**प्रशासनात बहुजन तरुणांचा वाढता सहभाग अभिमानास्पद : अतुल सावे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-ब परीक्षेत महाज्योतीच्या १२३ विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या दैदिप्यमान यशाबद्दल राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी आनंद आणि समाधान व्यक्त केले आहे. बहुजन समाजातील गुणवंत तरुणांना स्पर्धा परीक्षांमध्ये मार्गदर्शनाची योग्य दारे उघडी करून देणे हेच महाज्योतीचे मूळ उद्दिष्ट आहे. राज्य कर निरीक्षक पदाच्या ३५ टक्के जागांवर महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनी मारलेली धडक ही राज्य शासनाच्या कल्याणकारी धोरणांची आणि संस्थेच्या प्रभावी मार्गदर्शनाची पावती आहे. ग्रामीण व सर्वसामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश संपूर्ण महाराष्ट्रासाठी भूषणावह आहे.

भविष्यातही राज्यातील एकाही बहुजन विद्यार्थ्यार्चे स्वप्न आर्थिक किंवा इतर अडचणींमुळे अपूर्ण राहणार नाही, यासाठी शासन आणि महाज्योती संस्था पूर्ण ताकदीने विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभी राहील. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील प्रशासकीय प्रवासासाठी उदंड शुभेच्छा, असे मंत्री मा. अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात

### खापरखेडा येथे डॉ. अनिरुद्ध वानकर यांचा भव्य प्रबोधनाचा कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**



माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या ८२व्या जयंतीनिमित्त तसेच सद्भावना दिवसाच्या पर्वावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्यावतीने अनुसूचित जाती के लोगो, बीजेपी छोड़ो अभियानाचा भव्य उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या अभियानांतर्गत संविधान सत्यशोधक जलसा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, समतेची-संविधानाची गाणी, महापुरुषांची या संकल्पनेवर आधारित संविधान, सामाजिक समता आणि महापुरुषांच्या विचारांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम २० ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता काँग्रेस कार्यालय, मेन रोड, खापरखेडा येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक माजी मंत्री सुनील केदार आहेत.

यावेळी डॉ. अनिरुद्ध वानकर यांच्या भव्य प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संविधान, सामाजिक समता आणि महापुरुषांच्या विचारांवर आधारित या प्रबोधनातून नागरिकांना सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला जाणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रविंद्र चिखले यांनी केले आहे.

### भीमशक्तीचे संविधान चौकात आज निदर्शने आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय संविधानाने दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाची मूल्ये अबाधित ठेवण्याच्या मागणीसाठी भीमशक्तीच्या वतीने मंगळवार, १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता संविधान चौक, नागपूर येथे निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे. भाजप व त्यांच्या मातृसंघाच्या भूमिकेचा निषेध नोंदविण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले असून, संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भीमशक्तीच्या वतीने करण्यात आले आहे.

### विश्रांती कॉन्व्हेंट स्कूल निमखेडा येथे स्वतंत्रता दिवस उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

निमखेडा येथील विश्रांती कॉन्व्हेंट स्कूलने आपला ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहाने, देशभक्तीने आणि अभिमानाने साजरा केला. संपूर्ण शाळा परिसर तिरंगी फुगे, झेंडे आणि सुंदर पताकांनी सजवण्यात आला होता. सकाळी ८:०० वाजता शाळेच्या मुख्याध्यापिका शांता खांडेकर, रक्षक खांडेकर, शाळेच्या अध्यक्षा विश्रांती खांडेकर आणि संपादक बिंदू तागिरिसा यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे विशाल खांडेकर, गणेश आटे,प्रणय नेरलेवार आणि गावकरी उपस्थित होते. शाळेच्या प्राचार्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण केले आणि मुलांना देशाचे जबाबदार नागरिक बनण्याची प्रेरणा दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना मिठाई वाटण्यात आली.

### आदिवासी ढिवर समाज संघटनेतर्फे स्वातंत्र्यदिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आदिवासी ढिवर समाज संघटनेतर्फे स्व. खासदार जतिराम बर्वे तसेच स्वातंत्र्यदिना निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रेमकुमार गजघाटे समाजसेवक धनराज कणुर्के आणि मनोज नगरे, वनिताताई नगरे व रश्मिताई नान्हे यांची उपस्थिती होती. यावेळी समाजातील दिवंगत व्यक्तींच्या स्मृतींना अभिवादन करून सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात ध्वजारोहण करण्यात आले. तसेच समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाला समाजातील महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

### कान्होलीत स्वातंत्र्य दिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटपाचे वितरण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्होली येथे विद्यार्थ्यांना गावचे उपसरपंच श्री. मिलिंद रमेश कोवे यांच्या तर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे केंद्रप्रमुख भूपेश चव्हाण, मुख्याध्यापक वसंत पिसे, शिक्षिका सुषमा ठाकरे, अंगणवाडी शिक्षिका मीना कोवे, मदतनीस आचल कोवे, तसेच सुलोचना चवळे, नीता रंदई, सुनीता वलके, सुवर्णा वाघमारे, अरविंद उईके, गजानन खंडारे आणि केशव डायरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल शाळेच्यावतीने उपसरपंच मिलिंद रमेश कोवे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

## प्रनाग हायस्कूल आजनगाव येथे स्वातंत्र्य दिवस विविध कार्यक्रमासह उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

प्रनाग हायस्कूल आजनगाव येथे स्वातंत्र्याचा सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्था सचिव पि. एन. गजभिये यांचे हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. नंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व देशभक्तीपर कार्यक्रमाद्वारे उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. वर्ग दहावीतील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, त्यांना प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या आठवणीची जपणूक म्हणून विज्ञान शिक्षक गजभिये यांनी शाळेस दिलेल्या विविध प्रजातींच्या झाडांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीरित्या व आनंददायी वातावरणात संपन्न झाला, विद्यार्थ्यांना गोड मिठाई आणि खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव, अध्यक्ष तसेच तलाठी समर्थ, पोलीस पाटील आजनगाव शिल्पा ढोणे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अनिल मते, पालक वर्ग किशोर वैद्य, ओंकार कोसरे, नामदेव भोयर, माधव हटवार, ओमप्रकाश मेश्राम, पोलीस मित्र स्वराज साठवणे, रिंकूताई पोटफोडे, मुंगाटे, क्षिरसागर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसह शाळेच्या मुख्याध्यापिका कु. बाबुलकर, शिक्षक सुरेश टांगले, राजू गेडाम, गुणरत्न गजभिये, लिपिक सुनील डोंगरे यांनी परिश्रम घेतले.

## प्रशासकीय दिरंगाईमुळे उघड्यावर जप्त पडलेला वाळूचा साठा चोरट्यांसाठी ठरला मोफत खजिना

### गाडीसह मुख्य आरोपी पोलिसांच्या हाताबाहेर, तहसीलदारांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यावर चोरांचा डल्ला, खापरखेडा पोलिसांची धडक कारवाई, ४२ लाखांच्या मुद्देमालासह आरोपी गजाआड



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

तहसीलदारांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यातूनच थेट वाळूची चोरी करणाऱ्या रेती माफियांच्या मुसक्या आवळण्यात खापरखेडा पोलिसांना यश आले आहे. १७ ऑगस्टच्या मध्यरात्री वलनी वेकोली वसाहत शिवारात ही धडक कारवाई करण्यात आली असून पोलिसांनी एका १२ चाकी ट्रकला ४ ब्रास वाळू आणि जेसीबीसह पकडले सदर कारवाईत एक आरोपी गजाआड झाला असून एकूण ४२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

७ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलनी वेकोली वसाहत शिवारात गस्त पोलिस गस्त घालत होते यावेळी पोलीसांना जप्त केलेल्या वाळू साठ्याजवळून एक संशयास्पद १२ चाकी ट्रक क्रमांक एमएच-४०-डीए-७६७३ जाताना दिसला शिवाय एक जेसीबी मशीनही उभी आढळून आली पोलिसांनी ट्रकची पाहणी केली असता त्यात ४ ब्रास वाळू भरलेली दिसून आली. यावेळी ट्रक चालक विक्की प्रकाश मेश्राम वय २५, रा. बिनासंगम याला वाळूच्या रॉयल्टीबाबत विचारणा केली असता तहसीलदारांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यावरून ही वाळू भरून दिल्याची कबुली दिली. खापरखेडा पोलिसांनी तत्काळ ट्रक चालक विक्की मेश्राम याला ताब्यात घेऊन अटक केली कार्यवाही दरम्यान १२ चाकी ट्रक,जेसीबी मशीन, ४ ब्रास वाळू असा एकूण ४२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला या प्रकरणी जेसीबी मालक धर्मेंद्र यशवंत वासनिक वय ३८, रा. कोराडी व ट्रक मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून खापरखेडा पोलीस पुढील तपास करत आहेत.

### २०१९ पासून साठा पडून, लिलाव कधी होणार?

१२ ऑक्टोबर २०१९ रोजी वलनी शिवारात तत्कालीन तहसीलदार दीपक करांडे, नायब तहसीलदार सतीश मिसाळ आणि मंडळ अधिकारी होमेश्वर पवार यांनी संयुक्त धाड टाकून तब्बल ४० ब्रास वाळू साठा, चार ट्रक आणि एक जेसीबी जप्त केला होता जप्त केलेल्या वाळू साठ्याची देखरेख करण्याची जबाबदारी स्थानिक कोतवालाकडे सोपवण्यात आली होती. मात्र मौजा पिपळा डाकबंगला येथे कोतवाल पद रिक्त असल्याने या वाळू साठ्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले. गेल्या काही वर्षांपासून या जप्त साठ्याचा लिलाव करण्यात आला नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे उघड्यावर पडलेला हा वाळूचा साठा चोरट्यांसाठी मोफत खजिना ठरला आहे.

## युवकांचा युवासेनेत प्रवेश : चंद्रपुरात पक्षसंघटन विस्ताराला वेग

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे)**

राजकारणात युवकांची भूमिका दिवसेंदिवस महत्त्वाची ठरत असून, युवा पिढीही सामाजिक व राजकीय प्रश्नांबाबत सजग होत आहे. या जागरूक युवकांना संघटित करून राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेनेतर्फे चंद्रपुरात युवकांचा पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला. रविवारी १६ ऑगस्ट सीडीसीसी बँकेच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्याला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.





युवासेना विस्तारक संदीप रियाल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला माजी नगरसेवक तथा शिवसेना महानगरप्रमुख सुरेश पचारे, शिक्षक सेना जिल्हाप्रमुख तथा चंद्रपूर-गडचिरोली संपर्कप्रमुख राजेश नायडू, युवासेना सहसचिव तथा युवती सेना जिल्हाधिकारी रोहिणीताई पाटील, माजी तालुकाप्रमुख प्रकाश खनके, शिवसेनेच्या माजी जिल्हा संघटिका कुसुमताई उदार आणि युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांत सहारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांत सहारे यांनी शिवसेना सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे संघटन असल्याचे सांगितले. सत्ता असो वा नसो, जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढणे ही शिवसेना व युवासेनेची ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रत्येक युवकामध्ये नेतृत्वाची क्षमता असून, परिसरातील समस्या सोडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. युवकांच्या प्रश्नांसाठी युवासेना सदैव त्यांच्या पाठीशी उभी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. युवासेना विस्तारक संदीप रियाल पटेल यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करत शिवसेना सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करणारा पक्ष असल्याचे सांगितले. कोविड महामारीच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जनतेची कुटुंबाप्रमाणे काळजी घेतल्याचा उल्लेख त्यांनी केला. नीट पेपरफुटी विरोधातील आंदोलनाला शिवसेनेने सुरुवातीपासून पाठिंबा दिल्याचे सांगत, तरुणांच्या प्रश्नांसाठी पक्ष सातत्याने त्यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चंद्रपुरातील या पक्षप्रवेश सोहळ्याचे श्रेय त्यांनी युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांत सहारे यांच्या नेतृत्वाला दिले. नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने आंदोलने करून सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधण्याचे काम सहारे यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पक्षाच्या कठीण काळात निष्ठा कायम ठेवणाऱ्या कुसुमताई उदार यांच्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते युवकांना भगवा धागा बांधून युवासेनेत अधिकृत प्रवेश देण्यात आला. यावेळी पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी विविध पदांवर कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली.

महेश श्रीगिरीवार यांची युवासेना उपजिल्हाप्रमुख, बल्लारशा विधानसभा, सोहेल नौशाद खान यांची विधानसभा समन्वयक, बल्लारशा, सागर गबने यांची युवासेना तालुकाप्रमुख, चंद्रपूर, फरदिन सय्यद यांची शहरप्रमुख, चंद्रपूर, पवन ऊकडे यांची तालुका समन्वयक, चंद्रपूर, तर निखिल मेकेलवार यांची शहरप्रमुख, बल्लारशा म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## सरफोजीराजे मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.शरद गोरे निवड

### तंजावरच्या भूमीत रंगणार ऐतिहासिक सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने येत्या २३ सप्टेंबर रोजी तंजावर (तामिळनाडू) येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'द्वितीय सरफोजीराजे मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक, ज्येष्ठ विचारवंत डॉ. शरद गोरे यांची सवार्नुमते निवड करण्यात आली आहे. तंजावर संस्थानचे युवराज श्रीमंत संभाजीराजे भोसले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही अधिकृत घोषणा केली. महाराष्ट्राचे माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे हे या ऐतिहासिक संमेलनाचे स्वागताध्यक्ष असणार आहेत. तंजावरचे छत्रपती सरफोजीराजे भोसले हे २८ भाषांमध्ये पारंगत असणारे अष्टपैलू राजे होते. त्यांनी मराठी, संस्कृत, तमिळ, मोडीसह विविध भाषांमध्ये ३५ महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखन केले. जगातील सर्वात समृद्ध मानल्या जाणाऱ्या 'सरस्वती महाल' ग्रंथालयाची निर्मिती हे त्यांचे अजरामर योगदान आहे.

त्यांच्या याच उत्तुंग साहित्यिक, कला, संगीत, आरोग्य आणि शैक्षणिक कायार्चा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. दक्षिण भारतात होणारे हे पहिलेच वैशिष्ट्यपूर्ण मराठी साहित्य संमेलन ठरणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांचे मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनात अतुलनीय योगदान राहिलेले आहे. त्यांनी १० ग्रंथांचे विपुल लेखन केले असून छत्रपती संभाजी महाराजांच्या 'बुधभूषण' या संस्कृत ग्रंथाचा मराठी काव्यानुवाद साकारला आहे. परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली आजवर १९७ साहित्य संमेलने पार पडली असून, या कार्याची नोंद 'अमेरिकन बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये झाली आहे. याशिवाय ६ मराठी चित्रपटासाठी अभिनयासह गीतलेखन संगीत दिले आहे व लेखन दिग्दर्शन केले आहे,त्यांच्या एक प्रेरणादायी प्रवास सूर्या या मराठी चित्रपटास कान्स व बर्लिन या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पारितोषिक मिळाले आहे. १५५ पुस्तकांचे 'युगंधर प्रकाशन'द्वारे प्रकाशन आणि २ हजारांहून अधिक व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी मोठी प्रबोधन चळवळ उभारली आहे. डॉ. गोरे यांच्या या निवडीबद्दल साहित्यिक व सांस्कृतिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आह

## शिक्षण आरोग्य रोजगार महिलांवरील अत्याचार जल जमीन जंगल लुट थांबवणे मानव कल्याणात काळाची गरज : यशवंत तेलंग



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सविधान लोकशाही समता फाउंडेशनतर्फे १५ ऑगस्ट २०२६ ला दुपारी ३ वाजता संविधान चौक नागपूर येथून न्यायात्रेच्या शुभारंभ यशवंत तेलंग यांच्या नेतृत्वात करण्यात आला. याप्रसंगी उपरोक्त फाउंडेशनचे मुख्य संयोजक योगेश ठाकरे, संदीप सिंग यांच्या शुभहस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला भव्य पुष्पमाला अर्पण करण्यात आले. न्यायात्रेला विजय खवसे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी यशवंत तेलंग, योगेश ठाकरे, संदीप सिंग, यांनी न्यायात्रेच्या तर्फे पुष्प देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी निहाल पाटील, दादाराव तायडे, आशिष मेश्राम, नरेंद्र सोमकुवंर, भोजराज सरोदेसह शेकडो नागरिकांनी या न्याय यात्रेला मनपूर्वक हृदयात्मक शुभेच्छा दिल्यात. ही न्याययात्रा शिक्षण, आरोग्य, रोजगार महिला वरील अत्याचार, जल जमीन जंगल ची लूट थांबवणे मानव कल्याणात काळाची गरज आहे. देशातील ९४ हजार शाळा बंद झाल्या असून १.२ लाख शाळा रस्त्याविना आहेत. मेघालय, नागालँड, अरुणाचल प्रदेश, ओडीसा, झारखंड, मध्य प्रदेश सह इतर राज्याची स्थिती भयानक असून एक लाख शाळा, एक शिक्षक शिकवणाऱ्या असून राज्यात १७९३ शाळा एकही विद्यार्थी नाही चाळीस टक्के मुलं बारावीपर्यंत जात नाही शिक्षणावर ३.१० लाख करोड रुपये असून ते कमी आहे.

तो देशाच्या जे काही उत्पन्न किंवा मुनाफ आहे त्याच्या २५% रेव्हनीचा असायला पाहिजे ५२० करोड रुपये रख रखाव आणि मरमत करिता आवंटित आहे. ओएनजीसी या सरकारी उपक्रमाच्या कंपनीकडून संस्थांना ६६८ करून फंड देण्यात आला असून १६ हजार करोड रुपये अडाणी समूहाला माफ करण्यात आले असंख्य अनेक उद्योगपतींना दहा हजार करोड पडतो. त्यावर आजपर्यंत माफ करण्यात आले. तरी त्यांची आर्थिक स्थिती श्रीमंताच्या यादीत आहे आणि गरीब कर्जदाराला शिक्षा भोगावी लागत आहे. लाखाच्या वर महिला अत्याचार ग्रस्त झालेल्या असून प्रशासनाच्या उदासीनतेने न्याय मिळण्यास विलंब होत असल्याने न्यायालयीन प्रशासकीय व्यवस्थेने ताशेरे ओढलेले आहे.

अशा बेजबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करून अत्याचार ग्रस्त लाखो महिलांना न्याय द्यावा. जल जमीन जंगल ची लूट सुरू असून एक रुपये वार्षिक रिलीज वर उद्योगपतींना देऊन हजारो वर्षाचे जंगल मोठ्या मशनरी लावून उध्दस्त करण्यात येत आहे. त्याचा परिणाम मानवाला धरतीवर वायू प्रदूषण ऑक्सिजन आरोग्यावर होत असून या सर्व प्रश्नांना घेऊन न्याययात्रा १५ ऑगस्ट ते २६ नोव्हेंबर २०२६ ला दिल्ली येथे ११ लाख स्वाक्षरी निवेदन सादर महामहीम राष्ट्रपतींना यशवंत केलं योगेश ठाकरे संदीप सिंग यांच्या नेतृत्वात शिस्त मंडळ सादर करणार असून सर्व राज्यातील नगरसेवक आमदार खासदार व जिल्हाधिकारी या मान्यवरांना वरील प्रश्नावर न्यायक निवेदन व एक वृक्ष देऊन ११ लाख स्वाक्षरी निवेदने न्यायात्रेद्वारे देणार असून ती न्यायात्रा या सर्व प्रश्नावर न्याय मागणार आहे तेव्हा जनतेने या प्रशासकीय उदासीन यंत्रणेवर आपल्या निवेदनावर स्वाक्षऱ्याकडून मोठ्या संख्येने आपण न्यायात्रेला सफर करण्याचे आवाहन यशवंत तेलंग योगेश ठाकरे आणि संदीप सिंग यांनी केलेले आहे

# मारबत महोत्सवात उत्तम सोयीसुविधा पुरविण्यासाठी मनपा कटिबद्ध : महापौर

### महापौरांनी घेतला मनपाच्या मारबत महोत्सवाच्या तयारीचा आढावा, आयोजन, लोकप्रतिनिधींशी केली चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या सांस्कृतिक परंपरेची ओळख असणाऱ्या मारबत महोत्सवाला आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी नागपूर महानगरपालिका प्रयत्नरत असून, बडग्या-मारबत महोत्सवात आयोजक आणि सर्व सामान्य नागरिकांना उत्तम सोयीसुविधा पुरविण्यासाठी मनपा कटिबद्ध असल्याचे महापौर निता ठाकरे यांनी बैठकीत सांगितले.



नागपूर महानगरपालिकाद्वारे आयोजित नागपूरच्या पारंपारिक व ऐतिहासिक ओळख असणाऱ्या 'मारबत महोत्सवाच्या अनुषंगाने आवश्यक नियोजन व उपाययोजना करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेत सोमवारी (ता.१७) डॉ. पंजाबराब देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात विशेष बैठक पार पडली. बैठकीला आमदार श्री. प्रवीण दटके, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, नगरसेविका आभा पांडे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती सभापती अश्विनी जिचकार, जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे, महिला व बालकल्याण विशेष समिती सभापती सारिका नांदुरकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगानंथम एम., नगरसेवक सुधीर राऊत, नगरसेवक संजय बालपांडे, नगरसेविका रामा उईके, अभिरुची राजगिरे, नगरसेवक संजय चावरे, नगरसेविका सय्यद मुस्कान सय्यद इरफान, नगरसेविका सय्यदा बेगम मोहम्मद निझामुद्दीन, नगरसेवक वासिम खान, नगरसेवक तुषार लारोकर, नगरसेविका स्वीटी भिसीकर, रेखा निमजे, नगरसेवक हेमंत बरडे, नगरसेविका चेतना निमजे, रामभाऊ आंबुलकर, संजय अवचट, प्रभाग २२ चे नगरसेविका कल्पक भानारकर, उमा देशमुख, कल्पना शर्मा, श्रीकांत आगलावे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) आदित्य मिरखेलकर, मनपाचे उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त मंगेश खवले, काळी व पिवळी मारबत उत्सव समितीचे विजय खोपडे, गौरव हरडे, बुरडे व बडग्या उत्सव समितीचे सदस्य, विवेक रानडे, व्हीआयडीचे कपिल चांद्रायन उपस्थित होते.

नागपूर शहरात पर्यटकांचा ओघ वाढविण्यासह शहराचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी तसेच नागपूरचा सांस्कृतिक वारसा समृद्धकरण्यासाठी मनपाद्वारे मारबत महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी मनपाच्या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. यासंदर्भात झालेल्या बैठकीत मारबत व बडग्या महोत्सवाच्या तयारीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी महापौर निता ठाकरे यांनी आयोजन समिती, पोलीस विभाग व इतर सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, तसेच महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासह मारबत महोत्सवाच्या तयारीतील विविध कामांचे नियोजन व अंमलबजावणी सुरळीत पार पाडण्यासाठी एका विशेष 'समन्वय समिती'ची तातडीने स्थापना करण्याचे निर्देश दिले. याशिवाय मारबत व बडग्या यांच्या मिरवणूक मार्गावरील सुसज्ज ठेवावा, मारबती व बडग्या यांच्या स्वागतासाठी प्रमुख ठिकाणी स्टेजची व्यवस्था करावी, विद्युत व्यवस्था करावी, स्वागत गेट उभारावेत आदी सूचना दिल्या.

आमदार प्रवीण दटके यांनी मारबत-बडग्या हा नागपूरच्या सर्व सामान्य नागरिकांचा उत्सव असल्याचे सांगत समाजातील घातक विषयांना समजा पुढे आणण्यासाठीचे माध्यम आहे. सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या या महोत्सवाची ख्याती जागतिक पातळीवर नेण्यासाठी सर्वांनी मिळून कार्य करायला हवे असे सांगितले. तसेच मिरवणूक बघण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना पाण्यासह इतर सोयी सुविधा उत्तमरित्या पुरविण्यात याव्या, बडग्या तयार करताना काही नवीन संकल्पना सुचवाव्यात अशा सूचना दिल्या.

बैठकीत सर्वप्रथम स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून मारबत महोत्सवाची संपूर्ण माहिती दिली. त्यांनी सांगितले की, १४५ वर्षांचे ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या मारबत उत्सवाला प्राप्त आहे. नागपूरची ऐतिहासिक संस्कृती जपणाऱ्या या महोत्सवात नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग राहावा आणि शहराचे वैभव जगासमोर यावे, यासाठी मनपाद्वारे मारबत महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त व्यक्तींना निमंत्रित केले जाणार आहे. तसेच नागरिकांच्या मनात महोत्सवाचे उत्साह निर्माण व्हावा याकरिता ईडा पिडा घेऊन जा गे मारबत असे बोधचिन्ह, मोमेंटो, भेट वस्तू महोत्सवात येणाऱ्या नागरिकांना देण्याचा मानस आहे.

## समाजाच्या उत्कर्षासाठी जिजाऊ साऊंची विचारांची गरज : आरती झोटिंग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

समाजाच्या उत्कर्षासाठी जिजाऊ साऊंच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन ५ व्या, राजकुमार काळभोर स्मृती साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष ज्येष्ठ लेखिका व कवयित्री नागपूरच्या कन्या आरती झोटिंग यांनी व्यक्त केले, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेने या संमेलनाचे आयोजन पुणे येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन मध्ये केले होते.



संमेलनातील त्यांच्या ओजस्वी भाषणाने संपूर्ण सभागृह दणाणून सोडले. महिलांच्या संवेदनशील विचारांचा आणि साहित्यातील क्रांतीचा वेध घेत त्यांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. आपल्या अध्यक्षीय भाषणात आरती झोटिंग यांनी मांडलेले प्रमुख विचारः विद्रोही स्त्रीमनाची अभिव्यक्तीः महिलांचे साहित्य आता केवळ चार भिंतींच्या चौकटीत बंदिस्त नसून, ते समाजचिंतन आणि सामाजिक विद्रोहाचे सशक्त साधन बनले आहे.

बदलती स्त्री-प्रतिमाः आजची लेखिका स्वतःची नवी ओळख निर्माण करत आहे. तिचे लेखन केवळ भावनाप्रधान नसून व्यवस्थेला रोखठोक प्रश्न विचारणारे आहे. वाचनसंस्कृती आणि सामाजिक बदलः नवीन पिढीतील महिलांनी लेखन आणि वाचनाची ही समृद्ध परंपरा पुढे नेऊन साहित्याला सामाजिक परिवर्तनाचे हत्यार बनवावे. आरती झोटिंग यांच्या या परखड आणि प्रेरणादायी भाषणाने संमेलनात एक नवी वैचारिक ऊर्जा निर्माण केली. संपूर्ण सभागृहाने टाळ्यांच्या गजरात त्यांच्या विचारांचे स्वागत केले. बाळासाहेब देशमुख व राजेंद्र फंड यांना मृत्युंजयकार शिवाजी सावंत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, ज्येष्ठ कवी, ज्ञानेश्वर धायरीकर यांच्या माझे काव्य विश्व या काव्यसंग्रहाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

ज्येष्ठ कवी नाना माळी व युवा कवयित्री साक्षी जमादार यांच्या अध्यक्षतेखाली कवि संमेलनांची दोन सत्र संपन्न झाली यामध्ये राज्यातील मोठ्या संख्येने कवींनी आपला सहभाग नोंदवला होता, सुर्यकांत नामगुडे, किशोर टिळेकर, साक्षी जमादार, सुवर्णा वाघमारे, वर्षा मुस्केवाड यांच्या कवितांनी उपस्थितांची मने जिंकली,या प्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे, स्वागताध्यक्ष शर्मिला गायकवाड, साहित्य परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शुभांगी काळभोर, राष्ट्रीय खजिनदार फुलचंद नागटिळक, पुणे विभागीय अध्यक्ष सुर्यकांत नामुगडे, ज्येष्ठ साहित्यिक किशोर टिळेकर, प्रदेश संघटक सचिव अमोल कुंभार, प्रदेश सरचिटणीस विक्रम शिंदे, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस, सुवर्णा वाघमारे, संगीता लंघे, पुणे जिल्हा अध्यक्ष रमेश रेडेकर, प्रा.सुरेश वाळेकर, पुणे शहर सचिव बाळकृष्ण अमृतकर,संघटक सचिव योगेश चौधरी व आदींची उपस्थिती होती.

## कोदामेंढी येथे विविध ठिकाणी ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

कोदामेंढी येथे विविध शासकीय व खाजगी कार्यालय, शाळा, संस्थांमध्ये ध्वजारोहण करून स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच आशिष बावनकुळे यांच्या हस्ते, जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य सुरेश ढोके यांच्या हस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर हरणे यांच्या हस्ते, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक मानकर यांच्या हस्ते, राजेश्वरी रेड्डी स्कॉलर कॉन्व्हेंट येथे संचालक सत्यनारायण रेड्डी यांच्या हस्ते, दयाराम भोयर पब्लिक स्कूल येथे प्रतिष्ठित नागरिक रामबाबू देवनेनी यांच्या हस्ते, साईबाबा पतसंस्थेत संस्थेचे संचालक तथा भावी अध्यक्ष श्याम देवतळे यांच्या हस्ते, बाजार चौक येथे माजी सरपंच उमाकांत देवतळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. इतरही ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, माजी उपसभापती अशोक हटवार, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष विवेक देवतळे, उपसरपंच गोपाल गिरमेकर, ग्रामपंचायत सदस्यगण विष्णू बावनकुळे, खुशाल शिवणकर, रवी ठवकर, सदानंद मेश्राम, अनिता हटवार, कोमल खडसे, स्वाती गौरखेडे, रूपाली ठाकरे, अंजली मोहूर्ले, हेमलता देवतळे सह शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरी-घिवारी ग्रामपंचायतीचा आदर्शवत उपक्रम; दिव्यांगांच्या हस्ते ध्वजारोहण, विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप

***मौदा तालुक्यातील बोरी-घिवारी ग्रामपंचायतीत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा, सरपंच विशाल सेलोकर यांच्या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक***

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत गट ग्रामपंचायत बोरी-घिवारीच्या वतीने यंदाही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिव्यांग बांधव कु. रोहित बुरुडे हस्ते ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रध्वज फडकवून स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यानंतर बोरी व वाघबोडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या वतीने स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प सरपंच विशाल सेलोकर यांनी केला आहे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक साहित्य देणे नव्हे, तर ग्रामीण भागातील मुलांना दजेर्दार शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे यावेळी दिसून आले.



गावाचा विकास म्हणजे केवळ रस्ते, नाल्या आणि इमारती नव्हे,आपल्या गावातील मुलांना चांगले शिक्षण आणि त्यांच्या डोळ्यांत मोठी स्वप्ने निर्माण करणे हाच खरा विकास आहे, अशी भूमिका सरपंच विशाल सेलोकर यांनी यावेळी व्यक्त केली. विशेष म्हणजे, बोरी-घिवारी ग्रामपंचायतीत सरपंच विशाल सेलोकर यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने नवनवीन आणि समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. शिक्षण, आरोग्य, सामाजिक बांधिलकी, महिला व बालकल्याण तसेच गावाच्या मूलभूत विकासकामांना प्राधान्य देत ग्रामपंचायतीने आपल्या कामाची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे मौदा तालुक्यात नवनवीन उपक्रम राबविणारी आणि लोकाभिमुख काम करणारी ग्रामपंचायत म्हणून बोरी-घिवारीची चर्चा होत आहे.

यावेळी कार्यक्रमाला पशुवैद्यकीय अधिकारी कोदामेंढी डॉ. रिना रामटेके, वैद्यकीय अधिकारी अरोली डॉ. मानसी हरणे, ठाणेदार अरोली स्नेहल राऊत, ग्रामविकास अधिकारी वैभव बावनकर, उपसरपंच दिनेश पटले, ग्रामपंचायत सदस्यगण नंदू खंडाईत, वेंकटरमण जित्तुगा, मेघा बोंबले, सुषमा राऊत, स्वरस्वती पंपन्ना, संगीता गभणे, मुख्याध्यापक बोरी प्रतेके, आशा सेविका रंजना चवळे, अंगणवाडी सेविका दामिनी तिजारे, तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा भुते, शाळा समिती अध्यक्ष अश्विनी गोंधुळे, मुख्याध्यापक वाघबोडी पठाले, अंगवाडी सेविका माला पटले, शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अल्पावधीतच विविध लोकाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून युवा सरपंच विशाल सेलोकर यांनी आपल्या कायार्ची वेगळी छाप निर्माण केली आहे. पारंपरिक पद्धतीच्या ग्रामपंचायत कारभाराला विकासाची आणि सामाजिक उपक्रमांची जोड देत त्यांनी गावातील प्रत्येक घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर भर दिला आहे.

विशेषतः शिक्षण व्यवस्थेला दिलेले प्राधान्य ही त्यांच्या कायार्ची ठळक बाजू मानली जात आहे. शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. गाव बदलायचे असेल तर सुरुवात शिक्षणापासून झाली पाहिजे, या विचारातून विद्यार्थ्यांसाठी भविष्यातही आणखी उपक्रम राबविण्याचा निर्धार सरपंच विशाल सेलोकर यांनी व्यक्त केला.

दिव्यांग बांधवांच्या हस्ते ध्वजारोहण करून समाजातील प्रत्येक घटकाला समान सन्मान देण्याचा संदेश आणि विद्यार्थ्यांच्या हातात स्कूल बॅग देऊन शिक्षणाला प्राधान्य देण्याचा संकल्प, या दोन्ही गोष्टींमुळे यंदाचा स्वातंत्र्य दिन बोरी-घिवारी ग्रामपंचायतीसाठी विशेष ठरला.

गावाच्या विकासासोबतच सामाजिक जाणीव, शिक्षण आणि लोकसहभाग यांचा सुंदर मेळ घालत सरपंच विशाल सेलोकर यांच्या नेतृत्वाखाली बोरी-घिवारी ग्रामपंचायतीची विकासाची आणि समाजसेवेची वाटचाल सुरू आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## विरंगना रानी अंवतीबाई लोधी यांची जयंती



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकतीच सुभाषजी नोरोलीये यांच्या तर्फे त्याच्या सुजल सिमेंट प्राडक्ट्स कंपणी सावरगाव रोड काटोल येथे विरंगना रानी अंवतीबाई लोधी यांची १९५ व्या जयंती दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी मोठया थाटात सपन्न झाली.आज शेतकरी संघर्स कृति समिती काटोलतर्फे आम्ही सर्वे उपस्थिती होतो. अंवतीबाई लोधी यांचा जन्म मधप्रदेश सिवणी जिल्हात झाला. तो १६ आँगस्ट १८३१ साली झाला. त्यांनी त्याग, बलिदान, धैर्य,शौर्य, अमिट शाप उमटविनाऱ्या अंवतीबाईला मनःपूर्वक स्मृतीला वंदन करून अभिवादन त्या इंग्रजाच्या अन्याया विरुद्ध निर्भयपणे संघर्स केला. त्या लढल्या.

यावेळी समितीतर्फे अध्यक्ष बाबाराव वाघमारे, अंवतीबाई संस्थेचे अध्यक्ष सुभाषजी नोरोलीय, प्रफुल्लदादा जोशी, प्रा. रमेशजी येवले, हरीशजी मानकर, रामराव पाटील, सुवर्णा पवार, संगीताताई नोरोलीये, पुष्पा सावरकर, लता कडू नगरसेविका, माजी नगरसेविका जयश्री भुरसे, डॉ. सुधाकर कावळे, पत्रकार कोमलजी कुमेरिया, दिलीपजी वंजारी, ध्यानेश्वर बंजारे, यमुना परोडिया, सुनीता काळे, प्रमोदजी माहुरीये, रुपेश मुरोडिया, सुजल नोरोलीये, ज्योती राऊत, वर्षा मोरे, सुनीता काळे, मुकेश चौरे, ज्ञानेश्वर कुमेरिया, व इतर त्या केवळ इतिहास नसून राष्ट्रभक्तीच्या, त्यागाच्या, अनोमोल वारसा होत्या. अंवतीबाई लोधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्वांनीच अभिवादन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्यने पुरुष व महिला शक्ती उपस्थिती होते.

## ब्राह्मण सखी मंचचा श्रावण उत्सव संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ब्राह्मण सखी फोरमने १६ ऑगस्ट रोजी श्रावण सण मोठ्या आनंद, उत्साह आणि आनंदाने साजरा केला. या कार्यक्रमाला अंदाजे १५० ते २०० महिला आणि सदस्यांनी उत्साहाने हजेरी लावली. संपूर्ण कार्यक्रमातून श्रावण महिन्यातील सुंदर हिरवळ, आनंद आणि परस्पर स्नेह यांचे प्रतिबिंब दिसत होते. कार्यक्रमाच्या अगदी सुरुवातीपासूनच वातावरण आनंदाने भरून गेले होते. महिला श्रावणाच्या पारंपरिक आणि मधुर गीतांवर उत्साहाने नाचत होत्या. रंगीबेरंगी पोशाख परिधान केलेल्या सखींनी आपल्या सादरीकरणाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. श्रावणाची गीते, नृत्य, झोपाळे आणि मनोरंजक खेळ ही कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे होती. झोपाळ्यांनी आणि श्रावणाच्या गीतांनी सर्वांना जुन्या चांगल्या दिवसांची आणि श्रावणाच्या सुंदर परंपरांची आठवण करून दिली. सर्वांनी विविध मनोरंजक खेळांमध्ये उत्साहाने भाग घेतला. हास्य आणि मजा, संगीत आणि नृत्य होते—संपूर्ण वातावरण आनंद आणि जिव्हाळ्याने भरून गेले होते. मित्रांनी एकत्र अनेक फोटो काढून हे सुंदर क्षण अविस्मरणीय बनवले.

ब्राह्मण सखी फोरमचे ध्येय केवळ सण साजरे करणे नाही, तर महिलांना एकत्र आणणे, आपली संस्कृती आणि परंपरा जिवंत ठेवणे, तसेच परस्पर प्रेम आणि सलोखा वाढवणे हे देखील आहे. श्रावण सणाच्या निमित्ताने, सर्वांना दैनंदिन धावपळीतून सुटका मिळवून एकत्र काही आनंदाचे क्षण घालवण्याची आणि नवीन नातेसंबंध जोडण्याची संधी मिळाली. मंडळाचे सर्व अधिकारी, सदस्य आणि हितचिंतकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सहभागामुळे आणि उत्साहामुळे हा कार्यक्रम खरोखरच सुंदर आणि अविस्मरणीय ठरला.

## बाजार पेठ के नाग मंदिर में पुजा करनें पहुंची भीड़



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

नागद्वार पंच कमेटी रेलवे चौकी द्वारा नाग पंचमी महोत्सव का आयोजन किया, भगवान को प्रसन्न करने के लिए भजन, कीर्तन व महादेव के गानों के साथ नाग मंदिर के नाग देवता प्रसन्न करने के लिए चार दिवसीय नाग पंचमी कमेटी आयोजन किया। प्रथम दिन परिसर के महिला, पुरुष भजन मंडलों ने अनेक भजनों के साथ नाग भगवान को याद किया, पुराने जमाने में शहनाई वादन के साथ नागिन की धुन की आवाज भी इस मंदिर के स्टेज पर गुंजी,

नाग पंचमी के दिन भक्तो ने नाग भगवान के दर्शन करने के लिए कतार से खड़े थे, हजारों भक्तों ने दूध का अभिषेक किया व नारियल फोड़कर भगवान को प्रसन्न करने की कामना की, नाग पंचमी का मुख्य प्रसाद कढ़ाई का प्रसाद माना जाता है जिसमें १०१ किलो रवा,घी,साखर प्रसाद बनाया गया, कार्यक्रम को सफल बनाने के लिए नागद्वार पंच कमेटी के संस्थापक अरुण बोरीकर, श्रावण बोरीकर,अक्षय तिल्हासी,नरु पौनीकर ,राहुल ढोले,सुरेश गुडधे ,निक्कू पौनिकर, मोहन पौनिकर, प्रमोद पौनिकर, गोकुल तांडेकर, भीमा सोनवाने,राजू ढोले,असलम शेख,मनोज सारंगे, श्रीकांत उमाले, दुर्गा यादव,चतुर्वेदी महाराज, रोहित बोरीकर ने मेहनत की।

# 'मराठी पाऊल पडते पुढे...'मधून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन

### सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने 'मराठी पाऊल पडते पुढे...' या संगीत, नाट्य व नृत्यमय विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन रविवारी बी. आर. ए. मुंडले, प्लॅटिनम ज्युबिली सभागृह, दीक्षाभूमीजवळ करण्यात आले. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमाचे संयोजक अमर कुळकर्णी, संगीत नियोजन आनंद मास्टे व समन्वय गजानन रानडे यांनी केले होते. यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे अधिकारी वसंत खडसे, रुपेश गायधने, आमदार संजय भेंडे व उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते अविनाश बेंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गौरवगीताने झाली. दिंडी चालली व विठुचा गजर या सादरीकरणातून भक्तिमय वातावरण निर्माण झाले. त्यानंतर घनःश्याम सुंदरा, वासुदेव, हे हिंदू नृसिंह, अरुणोदय झाला, चाफेकर बंधू, मर्द आम्ही मराठे, नांदी, गाऊ नको किसना, रोन दोहे ना, आम्ही ठाकरं, हा रंग मराठी मातीचा, वेसावची पारू, मी हाय कोली, पारंपारिक खेळ, मोरया मोरया, डॉ. आंबेडकर, भारतीय घटनेचा तू, गीत रामायण मेडली, लखलख चंदेरी, आई भवानी, लल्लाटी भंडार आणि ने मजसी ने यांसारखी एकाहून एक सरस गाणी सादर करण्यात आली.

अफजल खान वध आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक या नाट्यप्रयोगांनी रंगत वाढवली. नृत्य, नाट्य आणि गायनाच्या प्रभावी सादरीकरणातून कार्यक्रमाला विशेष रंगत आली.



मराठी पाऊल पडते पुढे या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

अमर कुलकर्णी, अक्षय चारभाई, अमेय वैद्य, सायली मास्टे, मंजिरी वैद्य-अय्यर, आकांक्षा चारभाई आणि भूषण जाधव यांनी एकाहून एक सरस गाणी सादर केली. देविका मार्डीकर, रेणुका कोल्हारकर, वेदांत दांडेकर आणि वरूण व्यवहारे यांनी सहगायक म्हणून उत्तम साथ दिली.

गायकांना आनंद मास्टे, परिमल जोशी, अमर शेंडे, नरेंद्र कडवे, गौरव टांकसाळे, मोरेश्वर दहासहस्त्र, विशाल दहासहस्त्र, गजानन रानडे, विक्रम जोशी आणि पंकज यादव यांनी वाद्यवृंदावर साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मृण्मयी कुळकर्णी व चैतन्य देशपांडे यांनी उत्तमरीत्या सांभाळली. नाट्यसंयोजन सारंग मास्टे व अभिषेक बेल्लारवार, नृत्य संयोजन श्रीकांत धबडगांवकर, नेपथ्य राजेश अमिन यांचे होते. मनोज पिदडी, अभिषेक, मॉन्टी सोनुने यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## शाश्वत विकास व पर्यावरण संवर्धनाचा संकल्पः नबिरा महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातर्फे 'सीड बॉल'निर्मिती व वाटप उपक्रम उत्साहात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

भावी पिढीला निरोगी पर्यावरण लाभावे, हरित आच्छादन वाढावे आणि शाश्वत विकास व निरोगी पर्यावरण या ध्येयांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उदात्त उद्देशाने स्थानिक नबिरा महाविद्यालय, काटोल येथील वनस्पतिशास्त्र विभागातर्फे इको क्लबअंतर्गत अभिनव सीड बॉल निर्मिती व वाटप उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष बीजारोपणापासून निसर्ग संवर्धनाची जाणीव रुजवून जैवविविधतेचे रक्षण करणे आणि पर्यावरणाचा समतोल साधणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.



या उपक्रमांतर्गत दिनांक ६, ७ व ८ जुलै २०२६ रोजी नबिरा महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागात तीन दिवसीय विशेष सीड बॉल निर्मिती कार्यशाळा पार पडली. यामध्ये ऑर्किड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून माती, सेंद्रिय खत व विविध वृक्षांच्या बियांचा सुयोग्य वापर करत मोठ्या संख्येने पर्यावरणपूरक सीड बॉल्स तयार केले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बिपिनचंद्र काळबांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आज १५ ऑगस्ट २०२६ रोजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. राजूजी देशमुख यांच्या शुभहस्ते हे तयार केलेले सर्व सीड बॉल्स ऑर्किड पब्लिक स्कूल, काटोल येथील विद्यार्थ्यांना निसर्गात रुजवण्यासाठी सस्नेह प्रदान करण्यात आले.

या सोहळ्यास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजूजी देशमुख, उपाध्यक्ष निरंजनजी राऊत, कोषाध्यक्ष प्रकाशजी चांडक, नियामक मंडळाचे सदस्य पुरुषोत्तमजी मानकर, देवकीनंदनजी बिसानी, झुल्फिकारजी खोजा, प्रतिक खोना, तसेच नबिरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कुमार नवीन आणि कुसुमबाई वानखेडे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. सुरेश मोटवानी, ऑर्किड पब्लिक स्कूल च्या प्राचार्या डॉ. सुजाता गांधी आदी मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

हा संपूर्ण उपक्रम नबिरा महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील विभागप्रमुख प्रा. डॉ. बिपीनचंद्र काळबांडे, प्रा. डॉ. रीना मेश्राम, प्रा. सई थोटे, प्रा. तेजस्विनी पिलोंद्रे आणि प्रा. धीरज ढोबळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. तसेच या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयोगशाळा परिचर जयंत नागदिवे व निखिल बालपांडे यांनी मोलाचे परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी आत्मीयता निर्माण करणाऱ्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नस्पतिशास्त्र विभागाचे मनःपूर्वक कौतुक केले.

## वलनीजवळ ट्रकची कारला भीषण धडक, महिला पोलीस अंमलदार जागीच ठार

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
**(धनंजय पांढरे)**

चंद्रपूर-मूल मार्गावरील वलनीजवळ आज सकाळी ६.३० वाजताच्या सुमारास ट्रकने कारला समोरून दिलेल्या जोरदार धडकेत महिला पोलीस अंमलदार विशाखा बनसोड (३२) यांचा जागीच मृत्यू झाला. त्या तळोधी (बा.) पोलीस ठाण्यात कार्यरत होत्या. विशाखा बनसोड या आज सकाळी आपल्या मारुती स्विफ्ट कार क्रमांक एमएच ३४ बीआर २५६८ ने चंद्रपूर पोलीस मुख्यालय येथे आयोजित उजळणी वर्गासाठी जात होत्या.



दरम्यान, चंद्रपूर-मूल मार्गावरील वलनीजवळ समोरून येणाऱ्या ट्रक क्रमांक सीजी ०४ पीजे ९६१५ ने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की कारचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला.

या अपघातात विशाखा बनसोड यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे पाठविला. विशाखा बनसोड यांच्या आकस्मिक निधनाने पोलीस विभागात शोककळा पसरली असून, सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दुःख व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पती आणि तीन वर्षांची मुलगी तसेच आप्त परिवार आहे. या दुर्दैवी घटनेने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघाताची नोंद करून रामनगर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## जलसंधारण दिनानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांचे राज्यातील नागरिकांना आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

आपला महाराष्ट्र समृद्ध आणि हिरवागार असावा, हे आपल्या सर्वांचे स्वप्न आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात जलसंधारण दिन साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना जलसंधारणाच्या या जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये महा वॉकेथॉन- वॉक फॉर वॉटरचे आयोजन करण्यात आले आहे.

या वॉकेथॉनमध्ये तरुणांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे. जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी रील्स स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत युवा पिढीने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.या ऐतिहासिक जलसंधारण मोहिमेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या जाहिराती तसेच समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेला अधिकृत क्यूआर कोड स्कॅन करून नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे फडणवीस यांनी सांगितले.

## पारशिवनी येथील नागरी आयुष्यमान आरोग्य वर्धिनी केंद्राच्या उद्घाटन संपन्न

### आरोग्य हीच खरी संपत्ती - राज्यमंत्री आशिष जयस्वाल

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी येथील नागरी आयुष्यमान आरोग्य वर्धिनी केंद्राच्या उद्घाटन राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते (सोम.दि.१७ ऑगस्ट) रोजी करण्यात आले. याप्रसंगी मंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, "पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून प्रत्येक नगरपरिषदेत अशा आरोग्य वर्धिनी केंद्रांची उभारणी करून नागरिकांना त्यांच्या जवळच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न आहे. पारशिवनी येथे आधुनिक आणि सर्व सुविधांनी सुसज्ज आरोग्य व्यवस्था उभारण्याचे काम सुरू असून, उपजिल्हा रुग्णालयदेखील लवकरच सुरू करण्यात येणार आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.



आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. याच भावनेतून दवाखाना आपल्या दारी सारखे उपक्रम राबवून मोठ्या संख्येने नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. या उपक्रमातून आतापर्यंत १४ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी झाली आहे.

या निमित्ताने माझे आवाहन आहे की, विशेषतः वयाची चाळिशी ओलांडल्यानंतर प्रत्येकाने नियमितपणे आरोग्य तपासणी करून घ्यावी. अनेक आजार सुरुवातीच्या टप्प्यात लक्षात आल्यास त्यावर वेळीच उपचार करणे शक्य होते. आजार गंभीर अवस्थेत पोहोचल्यानंतर उपचार करणे कठीण होते; त्यामुळे वेळेवर तपासणी आणि योग्य उपचार अत्यंत महत्त्वाचे आहेत.

शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेमध्ये आता शेतमजुरांचाही समावेश करण्यात आला आहे. शेतमजुराचा अपघाती मृत्यू किंवा अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास या योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा आधार मिळणार आहे. शेतमजूर कुटुंबांसाठी हा निर्णय अत्यंत दिलासादायक आहे.

राज्य सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करत असताना सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडलेल्या आरोग्य, सुरक्षा आणि विकासाच्या प्रश्नांवर सातत्याने काम करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढील काळातही पारशिवणी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी पारशिवनी नगर पंचायत नगराध्यक्षा सुनिता प्रकाश डोमकी, उपाध्यक्ष दीपक दशरथ शिवरकर, सभापती योगिनी लोकेश बावनकुळे, बांधकाम सभापती रोशन ज्ञानेश्वर पिंपळमुळे,माजी सरपंच प्रकाश डोमकी, प्रेम भोंडेकर, माजी नगरसेवक राहुल ढगे, यांच्यासह नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

थोडक्यात

## पं. राजा काळे यांचा 'चिरंतन स्वराभिषेकी' कार्यक्रम १९ ऑगस्टला

### पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या निवडक गीतांचा रंगणार सुरेल आविष्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ गायक आणि पं. जितेंद्र अभिषेकी यांचे पट्टशिष्य पं. राजा काळे (मुंबई) यांच्या गायनाचा चिरंतन स्वराभिषेकी हा विशेष कार्यक्रम बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. स्वर साधना, श्री स्वामी सेवा मंडळ आणि लोकतंत्र सेनानी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात पं. जितेंद्र अभिषेकी यांनी गायलेली तसेच संगीतबद्ध केलेली निवडक गीतरचना पं. राजा काळे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत सादर करणार आहेत.

कार्यक्रमाला संस्कार भारती विदर्भ प्रांताच्या अध्यक्षा कांचनताई गडकरी, माजी आमदार प्रा. अनिल सोले, सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायिका डॉ. कल्याणी देशमुख आणि सामाजिक कार्यकर्ते शंकरराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तबला संगत सचिन बक्षी, पखवाज विशाल जोगळेकर, संवादिनीवर श्रीकांत पिसे तर तालवाद्य संगत जयंत उपगडे करणार आहेत. संगीतप्रेमी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सर्वांगसुंदर मधुर गायनाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजक संस्थेद्वारे करण्यात आले आहे.

## उमरेडचे प्रमोद उरकुडे यांचे हैदराबादमधील 'मना रन'मध्ये सुवर्णयश, १० किमी शर्यतीत पटकावला प्रथम क्रमांक!




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

हैदराबाद येथे पार पडलेल्या 'न्यूज १८ तेलगू' आयोजित 'मना रन' या राष्ट्रीय स्तरावरील धावण्याच्या स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वात उमरेड चे प्रमोद उरकुडे यांनी आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर सुवर्णयशाला गवसणी घातली. १० किलोमीटरच्या 'वेळेचे बंधन असलेल्या धावण्याच्या शर्यतीत' १० के टाईम्ड रन - वरिष्ठ पुरुष गट त्यांनी अप्रतिम वेग आणि सातत्याच्या जोरावर अव्वल स्थान पटकावून विजेतेपद आपल्या नावावर केले. या यशाबद्दल त्यांना १३,५०० रुपयांचे प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

**अशी राहिली चित्तथरारक कामगिरी**

स्पर्धेच्या अधिकृत निकालांनुसार, प्रमोद उरकुडे यांनी १० किलोमीटरचे कठीण अंतर अवघ्या ३५ मिनिटे २५ सेकंदांच्या 'चिप वेळेत' पूर्ण केले. तर त्यांची 'एकूण वेळ' ३५ मिनिटे २९ सेकंद इतकी नोंदवली गेली. स्पर्धेत ए. एम. आर. पी. यांनी ३५ मिनिटे ३७ सेकंद वेळेसह दुसरे, तर भास्कर कांबळे यांनी ३६ मिनिटे २२ सेकंद वेळेसह तिसरे स्थान मिळवले.

राष्ट्रीय पातळीवर मिळवलेल्या या अभूतपूर्व यशामुळे प्रमोद उरकुडे यांच्यातील अफाट वेग, जिद्द, कठीण परिश्रम आणि खेळाप्रती असलेली निष्ठा सिद्ध झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल क्रीडा क्षेत्रासह सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हे यश त्यांच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

## उमरेडमध्ये ८० व्या स्वातंत्र्यदिनी ८० मिनिटे 'नॉन-स्टॉप' स्केटिंगचा विक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून उमरेड स्केटिंग अकादमीच्या ३० स्केटर्सनी सलग ८० मिनिटे नॉन-स्टॉप स्केटिंग करून देशाच्या हुतात्म्यांना व स्वातंत्र्यसैनिकांना अनोखी आदरांजली वाहिली. हातात तिरंगा फडकवत, 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम'च्या जयघोषात स्केटर्सनी एकता व अखंडतेचा संदेश दिला. मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार विजेते तथा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक रवींद्र मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली हा विक्रम पार पडला. सहभागी सर्व स्केटर्सना सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले.

तापसी तांबे, निर्भय बांते, विरांश वैद्य, योग शेरकी, विराज कावळे, वीर माने, दक्षित आमगावकर, थावन राऊत, जयेश सहारे, सरन्या रामटेके, आर्या हातझाडे, विहान जैस्वाल, यादवी भिसे, रिया संत, विधी निंबाळकर, विष्णू भैरकर, वीरेंद्र कुंभारे, दर्शित कुहीकर, प्रवर्तक गडपाल, दिव्येश तांबे, शिवांश रोकडे, तन्मय विमलकर, धनंजय वारजूरकर, सिमरन ठाकरे, कृतिका चाचरकर, ओम बोरकर, प्रभास मिसाळ, रुची मिसाळ व प्रशिक्षक रवींद्र मिसाळ कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभा मिसाळ, पियुष खोंडे, जनक पाठक, सुजल कोसे व आयुष काळे यांनी सहकार्य केले. याप्रसंगी खेळाडूंचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुधीर काटेखाये यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



सुरेंद्रगड निवासी सुधीर देवेंद्रजी काटेखाये (वय ५० वर्षे) यांचे आज, सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सुरेंद्रगड घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. अंत्ययात्रा त्यांचे निवासस्थान प्लॉट नं. ५७२ ई, सुरेंद्रगड, कांचनमाला मराठी शाळेजवळ येथून सकाळी १०.४५ वाजता निघेल. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# 'कहानी वंदेमातरम की' नृत्यनाटिकेचा शानदार शुभारंभ

### 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्षानिमित्त नागरिकांची उदंड उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अमर राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' यास १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक औचित्यावर, नागपूर महानगरपालिका व राधिका क्रिएशनतर्फे ताराराणी फाउंडेशन निर्मित 'कहानी वंदेमातरम की' या हिंदी नृत्यनाटिकेचा भव्य शुभारंभ १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी झाला.

रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्याचे उद्घाटन मनपाच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नृत्यनाटिकेचे लेखक श्रीधरराव गाडगे, प्रमुख अतिथी राजेश लोया, प्रा. रवींद्र भुसारी आणि निर्माते संजय पेंडसे व्यासपीठावर उपस्थित होते.

सोहळ्याचा प्रारंभ श्री वेदामृत गुरुकुलमच्या विद्यार्थ्यांनी उच्चारलेल्या मांगलिक वेदऋचांच्या पठनाने झाला. यामुळे संपूर्ण सभागृहात चैतन्यमयी वातावरण निर्माण झाले. 'वंदे मातरम्' गीताच्या विविध ओळींवर आधारित अप्रतिम नृत्याविष्कार कलाकारांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

वंदे मातरम् गीताचा प्रेरणादायी इतिहास आणि त्याचा स्वातंत्र्यसंग्रामातील प्रवास व्हिडिओ माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आला. देशभक्तीने ओतप्रोत भरलेल्या या संगीतमय व नाट्यमय कलाकृतीचा नागपूरकर रसिकप्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आस्वाद घेतला आणि कलाकारांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली.

## संशयित बोगस डॉक्टरांविरोधात मनपाची शोधमोहीम, विशेष धाड पथके कार्यान्वित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील संशयित बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत विशेष धाड पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. नागरिकांना अधिकृत व सुरक्षित वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे तसेच अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाला आळा घालण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर निता ठाकरे यांच्या उपस्थितीत देण्यात आलेल्या सूचनेनुसार, बोगस डॉक्टरांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडून मार्गदर्शक सूचना क्र. ७६/२०२५, दि. ५ मे २०२५ अन्वये मनपास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये झोनल वैद्यकीय अधिकारी, हिवताप निरीक्षक, औषध निर्माण अधिकारी, पोलीस निरीक्षक/पोलीस पथक तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे.

मनपाचे अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी विशेष धाड पथकांची नियुक्ती करण्यात आली असून या पथकांमध्ये संबंधित झोनचे झोनल वैद्यकीय अधिकारी तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. या पथकांमार्फत झोननिहाय संशयित बोगस डॉक्टरांच्या दवाखान्यांची तपासणी करून आवश्यकतेनुसार नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

शासन निर्णयानुसार, शासनमान्य वैद्यकशास्त्रातील पदवी किंवा पदविका धारण केलेली नसलेली तसेच संबंधित वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी नसलेली व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय करत असल्यास अशा व्यक्तींचा बोगस किंवा अनधिकृत डॉक्टर म्हणून शोध घेण्यात येणार आहे. तसेच शासनमान्य वैद्यकीय पद्धतीव्यतिरिक्त मान्यता नसलेल्या विविध उपचारपद्धतींचा वैद्यकीय व्यवसायासाठी वापर करणाऱ्या व्यक्तींचीही तपासणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी संबंधित वैधानिक वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी असणे आवश्यक आहे.

## मध्यप्रदेशातून दारू वर्धेत नेतांना सालेकसा तालुक्यातील पिपरोया मार्गावर पकडली

### स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया पथकाची अवैध दारू वाहतूक विरोधात उत्कृष्ठ कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

गोरख भामरे, पोलीस अधीक्षक गोंदिया व अभय डोंगरे, अपर पोलीस गोंदिया यांचे निर्देश सूचनाप्रमाणे जिल्ह्यात व ईतर राज्यातून अवैधरित्या अवैध दारू वाहतूक दारू करणाऱ्या विरुद्ध धाड कारवाई करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांचे मार्गदर्शनात जिल्ह्यात व ईतर राज्यातून गोंदिया जिल्ह्यात अवैधरित्या अवैध दारू वाहतूक करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन सालेकसा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पथकास गोपनिय खात्रीलायक माहिती मिळाली की, ग्राम टेभुटोला ते पिपरीया मार्गाने एक चारचाकी वाहनात मध्यप्रदेश राज्यातून अवैधरित्या विनापास परवाना दारुची वाहतूक होणार आहे. या माहितीवरुन टेभुटोला ते पिपरीया मार्गावर पोलीस पथकाने सापळा रचून एक पांढऱ्या रंगाची चारचाकी वाहनास थांबवून गाडीमध्ये बसलेले दोन इसम १) चालक इसम नामे संजय सदाशिव राऊत वय ५१ वर्ष.रा. श्रीराम कॉलोनी यार्ड क्र. ६ बोरगांव मेघे जि. वर्धा व २) योगेश गोपाल पांडे रा. बोरगांव मेघे जि. वर्धा यांचे चारचाकी वाहनाची झडती घेण्यात आली असता वाहनाचे मागील डिक्कीमध्ये पाच खडार्चे बॉक्समध्ये रॉयल स्टंग कंपनीची १८० मिलीने भरलेले इंग्रजी दारु दिसून आली सदर दारुबाबद दोघांना विचारपूस करण्यात आली असता त्यांनी सांगितले कि,टेम्भूटोला येथे एका घरात दारू , बिअर हि लांजी मध्यप्रदेश येथील बाजारामधून खरेदी करून मध्यप्रदेश येथील स्टिकर काढून बनावट स्टिकर लावून सदरची दारू ब्रीझा कारने वर्धा येथे घेऊन जाणार होते.

कारमध्ये व घरात मिळून आलेले १) रॉयल स्टँग व्हिस्की, किंगफिशर बिअर ३४ बॉक्समध्ये ६९५ नग किमती २,७३,९१०/- २) एक विटारा ब्रीझा चारचाकी वाहन किमती ८,००,०००/- रुपये ३) एक अप्पल कंपनीचा आयफोन मोबाइल किमती ५०,०००/- ४) बनावट स्टिकर्स व इतर साहित्य ७७०७०/- रुपये असा एकूण १२,००,९८०/- रुपयाचा मुद्देमाल दोन्ही आरोपीकडून जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक गोंदिया गोरख भामरे, अपर पोलीस गोंदिया अभय डोंगरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रेवचंद सिंगनजुडे यांचे मार्गदर्शनात पोहवा विठ्ठलप्रसाद ठाकरे, पोहवा संजय चव्हाण , पोहवा सोमेन्द्रसिंग तुरकर, पोहवा सुबोधकुमार बिसेन, पोहवा इंद्रजित बिसेन, पोशी हंसराज भांडारकर यांनी कारवाई केलेली आहे.

## स्टार्टअप कॉन्क्लेव्ह व हॅकेथॉनचे उद्या उद्घाटन

### 'मंथन 4 युवा'मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या युवा-केंद्रित, तंत्रज्ञानाभिमुख आणि दूरदर्शी कार्यातून प्रेरणा घेऊन १ ते २३ ऑगस्ट २०२६ दरम्यान मंथन4युवा हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत १८ ऑगस्ट रोजी विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) येथे स्टार्टअप कॉन्क्लेव्ह, हॅकेथॉन तसेच, पेटेंट गॅलरी आणि सायन्स एक्झिबिशन चे आयोजन करण्यात आले आहे.

स्टार्टअप कॉन्क्लेव्हचे उद्घाटन ११वाजता मल्टी ॲक्टिव्हिटी कॉम्प्लेक्स येथे होणार असून लॉयड्स मेटल्स एंड एनर्जी लिमिटेड व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे यांची उपस्थिती राहील.

पेटंट गॅलरी चे उद्घाटन सकाळी ११ वाजता आमदार संजय भेंडे यांच्या हस्ते होईल. हॅकेथॉनचे उद्घाटन दुपारी १ वाजता सामाजिक कार्यकर्ती अमृता फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आयआयएम चे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांच्यासह व्हीएनआयटीचे संचालक प्रेमलाल पटेल यांची उपस्थिती राहील. नवकल्पना, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कल्पनांना या प्रदर्शनातून व्यासपीठ मिळणार आहे. उद्या होणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये १० हजार युवकांचा सहभाग राहणार आहे.

'मंथन4युवा'च्या विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, कला, संस्कृती, उद्योजकता आणि नेतृत्व अशा विविध क्षेत्रांमध्ये आपल्या क्षमता दाखविण्याची संधी मिळणार आहे. नागपूरातील शाळा, महाविद्यालये आणि युवकांनी या उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अभियानाचे संयोजक विष्णु चांगदे आणि रितेश गावंडे यांनी केले आहे.

या अभियानाच्या संचालन समितीत डॉ. राजेश गादेवार, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ. अभय मुद्गल, केतन मोहितकर, डॉ. संजय ढोबळे, डॉ. सोमदत्त करंजीकर, विनय चावला, प्रकाश शुक्ला, निधी बावशे, डॉ. सचिन हजारे, डॉ. प्रदीप बिबटे, विनोद कडू, डॉ. राजेश ढोबळे, डॉ. विजय दातारकर, वैभव बावनकर, डॉ. सुमित सिंह, डॉ. राजेश देवकाते, डॉ. गजानन पोलनवार यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश आहे.

**असे आहेत कार्यक्रम**

१८ ऑगस्ट - स्टार्टअप कॉन्क्लेव्ह, एलोकेशन कॉम्पिटीशन तसेच, पेटेंट गॅलरी आणि सायन्स एक्झिबिशन

१८ व १९ ऑगस्ट - नृत्य स्पर्धा

१९ व २८ ऑगस्ट - पेंटिंग स्पर्धेची अंतिम फेरी

२० ऑगस्ट - काव्य वाचन स्पर्धा व कॅम्पस लिडर्स समीट

२१ ऑगस्ट - स्पर्धा परीक्षा महोत्सव तर देशभक्तीपर गीतगायन स्पर्धेची अंतिम फेरी


२३ ऑगस्ट - समारोप

# पद्मश्री अशोक सराफ यांच्या अभिनय कारकिर्दीचा १९ रोजी नागरी सन्मान

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव, पुष्कर श्रोत्रींसोबत रंगणार दिलखुलास गप्पा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रात आपल्या सहजसुंदर, विनोदी तसेच अष्टपैलू अभिनयाने अनेक दशकांपासून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे पद्मश्री तथा महाराष्ट्र भूषण अशोक (मामा) सराफ यांच्या ८०व्या वर्षात पदार्पणानिमित्त नागपुरात भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर महानगरपालिका, श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि विदर्भ गौरव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, १९ ऑगस्ट रोजी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अभिनेते अशोक सराफ आणि अभिनेत्री निवेदिता सराफ यांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला महापौर नीताताई ठाकरे, उपमहापौर लीलाताई हाथीबेड, स्थायी समिती अध्यक्षा शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर आणि विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



पाच दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य अशोक सराफ यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरदर्शन या तिन्ही माध्यमांवर आपल्या अभिनयाची स्वतंत्र छाप उमटविली. विशेषतः विनोदी भूमिका साकारताना त्यांनी निर्माण केलेली सहजता, टायमिंग आणि संवादफेक यामुळे ते मराठीतील लोकप्रिय विनोदी अभिनेते म्हणून घराघरात पोहोचले. मात्र, त्यांच्या अभिनयाची व्याप्ती केवळ विनोदी भूमिकांपुरती मर्यादित राहिली नाही. गंभीर, भावनिक आणि विविध छटांच्या व्यक्तिरेखाही त्यांनी तितक्याच ताकदीने साकारल्या.

मराठी रंगभूमीवर त्यांनी अनेक गाजलेल्या नाटकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमटविला. चित्रपटसृष्टीतही त्यांच्या अभिनयाने अनेक भूमिका अजरामर केल्या. अशी ही बनवाबनवी, सवत माझी लाडकी, एक डाव भुताचा, धुमधडाका, नवरा माझा नवसाचा यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. दूरदर्शनवरील हम पांच सह विविध मालिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या अभिनयातील सहजता, प्रसंगानुरूप विनोदनिर्मिती आणि सहकलाकारांशी साधलेला अप्रतिम संवाद यामुळे अशोक सराफ यांना रसिकांनी प्रेमाने ह्यअशोक मामाह्ल ही उपाधी दिली. त्यांच्या प्रदीर्घ कलासेवेचा गौरव म्हणून त्यांना पद्मश्री आणि महाराष्ट्र भूषण यांसह विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**पुष्कर श्रोत्रींसोबत दिलखुलास गप्पा**

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे अशोक सराफ यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासातील आठवणींना उजाळा देणारा दिलखुलास गप्पा हा विशेष संवाद. प्रख्यात अभिनेते पुष्कर श्रोत्री हे अशोक मामांशी मनमोकळा संवाद साधणार आहेत. या संवादातून त्यांच्या अभिनय कारकिदीर्तील रंजक किस्से, रंगभूमीवरील सुरुवातीचे दिवस, चित्रपटसृष्टीतील अनुभव, गाजलेल्या भूमिका, सहकलाकारांच्या आठवणी तसेच त्यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासातील अनेक आठवणी रसिकांना जवळून ऐकण्याची संधी मिळणार आहे.

पश्चिम महाराष्ट्र, मुंबई या भागात त्यांचा सन्मान, सत्कार अनेक ठिकाणी झाला. मात्र, विदर्भामध्ये त्यांचा गौरव पहिल्यांदाच होत आहे. त्यामुळे नागरिकांनी या सोहळ्याला सपरिवार उपस्थित राहून आपल्या लाडक्या कलाकाराच्या गौरवाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. विपिन इटनकर (आयएएस), श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टचे अध्यक्ष संदीप जोशी आणि विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी केले आहे.